७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. १६ जून २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १७१ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# १६ आमदार आणि ७ खासदारांसोबत बोलणी

## एकनाथ शिंदेंच्या आमदाराचा मोठा दावा




**नागपूर (दै. संध्या)**

राज्यात सद्यस्थितीत कुठल्याही निवडणुका नसताना ठाकरेंच्या शिवसेना पक्षात वेगळा गट स्थापन होत असल्याची चर्चा सुरू आहे. ठाकरेंच्या शिवसेनेतील 7 खासदार स्वतंत्र गट स्थापन करणार असून एकनाथ शिंदेंच्या 'ऑपरेशन टायगर'शी चर्चा होत आहे. एकीकडे ही चर्चा सुरू असताना दुसरीकडे शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार कृपाल तुमाने यांनी मोठा गौप्यस्फोट केला आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे 16 आमदार आणि 7 खासदार यांच्यासोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अंतिम बोलणी झाल्याचा दावा त्यांनी केलाय. त्यामुळे, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चेला आणखी हवा मिळाली आहे. मात्र, मंत्री उदय सामंत यांनी स्पष्टपणे हा दावा फेटाळून लावला आहे. राज्यात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडून होत असलेल्या ऑपरेशन टायगरची जोरदार चर्चा सुरू असतानाच शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी मातोश्रीवर खासदारांची बैठक बोलावली होती. या बैठकीला 9 पैकी 5 खासदारांनी ऑनलाईन उपस्थिती दर्शवली. मात्र, त्यानंतर राजकीय वर्तुळात विविध तर्क वितर्क लावले जात आहेत. त्यातच, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे 16 आमदार आणि 7 खासदार यांच्यासोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची अंतिम बोलणी झाल्याचा दावा शिंदेंच्या शिवसेनेतील आमदार कृपाल तुमाने यांनी केला आहे. तसेच, ऑपरेशन टायरगर फायनल झाले आहे, फक्त या आमदार व खासदारांच्या पक्ष प्रवेशाची तारीख ठरायची आहे. उद्धव ठाकरेंच्या कार्यशैलीवर शिवसेना उबाठा पक्षातील आमदार, खासदार नाराज असल्याने ते शिवसेनेत प्रवेश करत आहे, असे कृपाल तुमाने यांनी म्हटले. उबाठाच्या कोणत्याही खासदारासोबत संपर्क नाही, अशी कोणतीही मीटिंग झाली नाही. आम्हाला ऑपरेशन टायगरची गरज नाही, असे म्हणत मंत्री तथा शिवसेना नेते उदय सामंत यांनी ऑपरेशन टायगर संदर्भात मोठं वक्तव्य केलं आहे. तसेच, संजय राऊत यांच्या पेशन्सला दाद देत त्यांनी उबाठाचं अस्तित्व टिकवलं आहे, असेही उदय सामंत यांनी म्हटलं. त्यामुळे, एकप्रकारे उदय सामंत यांनी ठाकरेंचे खासदार शिंदेंच्या संपर्कात नसल्याचेच सूचवलं आहे.

### रावसाहेब दानवे म्हणाले, भाजपशी संबंध नाही

ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार वेगळा गट तयार करण्याच्या हालचाली सुरू आहेत, ह्यासंदर्भात रावसाहेब दानवे म्हणाले की, ही चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. ह्या अगोदर तामिळनाडूमध्ये एक गट सुद्धा स्थापन झाला. एका पक्षात विलिनीकरण सुद्धा झाले. परंतु, ठाकरेंच्या शिवसेनेतील तो गट वेगळा होतो की नाही होतो, हे तोच पक्ष ठरवू शकतो. भारतीय जनता पार्टीचा आणि त्यांचा काहीही संबध नाही. अजून तरी गट स्थापन नाही, अशी प्रतिक्रिया दानवे यांनी ऑपरेशन टायगरवर दिली.

## सोमवती यात्रे निमित्त जेजुरी गडावर आकर्षक विद्युत रोषणाई



जेजुरी : महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या सोमवती अमावस्या यात्रेनिमित्त श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने जेजुरीच्या खंडोबा गडाला आकर्षक विद्युत रोषणाई व मुख्य गाभाऱ्याला केलेली आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे.

## IAS तुकाराम मुंढेंचा धसका!

# 'साहेब येणार'च्या नुसत्या अफवेनेच राज्यातील बाजारपेठांना कुलूप

**बुलढाणा (दै. संध्या)**

राज्यातील कडक शिस्तीचे आणि धडाडीचे सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी राज्याच्या अन्न आणि औषध प्रशासन (FDA) विभागाच्या आयुक्तपदाची सूत्रे हाती घेताच धडक कारवाईचा सपाटा लावला आहे. त्यांच्या या कठोर कार्यपद्धतीचा राज्यभर एवढा धसका घेण्यात आला आहे की, केवळ ते तपासणीसाठी येणार असल्याच्या अफवेनेच मोठ्या बाजारपेठा काही मिनिटांत कुलूपबंद होत असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. याचेच एक ताजे उदाहरण बुलढाणा जिल्ह्यात पाहायला मिळाले. मेहकर तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असलेल्या डोणगाव येथे सोशल मीडियावर 'एफडीएचे साहेब तपासणीसाठी येणार' असा एक मेसेज वाऱ्यासारखा पसरला. या केवळ एका मेसेजमुळे व्यापाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आणि काही मिनिटांतच संपूर्ण बाजारपेठ बंद झाली. कारवाईच्या भीतीने किराणा व मिठाईच्या दुकानांसह पानटपऱ्या आणि



हॉटेल चालकांनीही आपली दुकाने तातडीने बंद करून तेथून पळ काढला. तुकाराम मुंढे यांच्या आदेशानुसार अन्न आणि औषध प्रशासनाने आपला मोर्चा आता ग्रामीण भागाकडेही वळवला आहे. या धडक कारवाईचा धसका घेत अनेक छोटे-मोठे व्यावसायिक, हॉटेल चालक, तसेच किराणा आणि मिठाईच्या दुकानदारांनीही आपली दुकाने बंद करून पळ काढण्यातच धन्यता मानली. विशेषतः भेसळ करणारे आणि अवैध मार्गाने व्यवसाय करणारे व्यापारी आता चांगलेच धास्तावले असून, साहेबांच्या कारवाईच्या भीतीने त्यांनी आपले व्यवसाय बंद ठेवण्यास पसंती दिली आहे.

# अफवांवर विश्वास ठेऊ नका, आमचे खासदार आमच्या सोबतच

## आदित्य ठाकरे

**पुणे (दै. संध्या)**



महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या घडामोडींना वेग आलाय. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत संभाव्य फुटीच्या चर्चांनी जोर धरला आहे. उद्धव ठाकरे यांनी नुकतीच पक्षाच्या खासदारांची तातडीची बैठक मातोश्रीवर बोलावली होती. या बैठकीला 9 पैकी 5 खासदारांनी ऑनलाइन हजेरी लावली. बैठकीनंतर सर्व खासदार पक्षासोबत असल्याचा दावा ठाकरे गटाने केला. मात्र, काही खासदार नव्या गटाच्या स्थापनेच्या तयारीत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

यावर शिवसेना ठाकरे गटाचे युवा नेते व आमदार आदित्य ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत माहिती दिली आहे. ते म्हणाले, मला वाटते की आपण अफवांवर विश्वास ठेऊ नये. उद्धव साहेब आणि मी, आम्ही एक पथ्य पाळले आहे की जे आमच्यासोबत असतात त्यांच्यावर आम्ही अंधविश्वास ठेवतो. काही लोक अंधभक्त असतात, आम्ही अंधविश्वास ठेवणारे लोक आहोत.

पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, सगळे खासदार जे काही निवडून आले आहेत 2024 च्या लाटेमध्ये उद्धव साहेब प्रत्येक मतदारसंघात गेले आहेत. आम्ही असू, पवार साहेब असतील आम्ही सगळ्यांनी प्रचार केला होता. लोकांनी मशाल या चिन्हावर निवडून आणले आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे कालच्या आमच्या बैठकीत आपण पाहिले असेल सगळेच लोक तिथे उपस्थित होते, काही ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते आणि सगळे सोबत आहेत. तसेच ऑनलाइन येण्यात चुकीचे काय? असा सवालही आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला. काही खासदार फुटू शकतात, अशी शक्यता वर्तवली जात आहे. यावर बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, आपण पाहिले असेल की तृणमूल कॉंग्रेसमधले 20 खासदारांनी वेगळा गट तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. हे सगळे एहसान फरामोश लोक आहेत. जिंकले ममता दीदींच्या नावावर आणि आता लगेच उड्या मारून पळत आहेत. एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे की आमची केस आता 4 वर्ष झाले चालू आहे, राष्ट्रवादीची सुद्धा सुरू आहे. तसे पाहायला गेले तर ही फार मोठी घटना आहे की एखादा पक्ष चोरून त्याचे नाव आणि चिन्ह देऊ शकते. आमचे म्हणणे एकच आहे की लोकशाही नष्ट होताना दिसत आहे का? असा सवाल ठाकरेंनी उपस्थित केला.

एकाच राजकीय गोष्टीवर चिटकून न राहता, महाराष्ट्रात अनेक विषय आहेत, देशात अनेक विषय आहेत त्यावर देखील आपण चर्चा केली पाहिजे, असे आदित्य ठाकरे म्हणाले. पुढे ते म्हणाले, पक्ष तोडण्याच्या या ज्या गोष्टी आहेत ते देशात सगळीकडे सुरू आहे. आपण जगातली सर्वात मोठी लोकशाही होतो, आता आहेत असे वाटत नाही. आपण लोकांच्या प्रश्नावर बोलले पाहिजे, राजकारणावरच बोलत बसलो तर लोक आम्हाला मूर्ख समजतील.

शेतकरी कर्जमाफीच्या प्रश्नावर बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, आम्ही 2019 साली जे केले त्याला आम्ही कर्जमुक्ती म्हंटले होते. माफी कोणाला करतात गुन्हेगारांना, शेतकरी गुन्हेगार आहेत का? आम्ही कर्जमाफी न म्हणता तेव्हा कर्जमुक्ती म्हटले होते. आम्ही कुठल्याही अटी शर्थी न लावता आम्ही सरळ सेवा सुरू केली होती. आत्ता जी कर्जमाफी आहे ती उपकार केल्यासारखी आहे. म्हणजे एका बाजूला आपण पाहतोय की जवळपास 85 लाख महिलांचे जे काही लाडकी बहीण योजनेतले पैसे होते ते वळवले आहेत असे दिसत आहे. म्हणजे 85 लाख महिलांचा वापर केला, मतदान घेतले आणि आता सोडून दिले, त्यांना अपात्र ठरवण्यात आले. त्यातून आता हे कर्जमाफी करत आहेत.

पुढे बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, पुण्यातील वेताळ टेकडीचा विषय आहे, गणेश खिंडीचा विषय आहे, नद्यांचा प्रश्न आहे, हे सगळे विषय आम्ही अधिवेशनात मांडणार आहोत. मी पर्यावरण मंत्री असताना मी शाश्वत विकास करणार होतो. सरकार असो किंवा नसो हे करण्यासाठी मी आताही प्रयत्न करणार आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com



## ढिंग-टांग




## भंडाऱ्याची उधळण करीत, 'सदानंदाचा येळकोट... येळकोट', 'जय मल्हार' जयघोष

# जेजुरी गडावर तीन लाखाहून अधिक भाविकांची गर्दी

**जेजुरी (दै. संध्या)**



अवघ्या महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या खंडेरायाच्या सोमवती यात्रेनिमित्त लाडक्या खंडोबा देवाचे देवदर्शन आणि कऱ्हा स्नान, कुलधर्म कुलाचारासाठी ऐतिहासिक जेजुरीनगरीत तीन लाखांहून अधिक भाविकांची गर्दी झाली होती. खंडोबा देवाच्या पालखी सोहळ्यावेळी मंदिर गडकोटांसह कऱ्हा नदीतीरी भंडाऱ्याची उधळण करीत, 'सदानंदाचा येळकोट... येळकोट', 'जय मल्हार' असा जयघोष भाविकांनी केला.

दीड वर्षानंतर सोमवार (दि. 15) रोजी सोमवती यात्रा भरली होती. यामुळे राज्यातील विविध ठिकाणावरून आलेल्या सुमारे तीन लाखाहून अधिक भाविकांनी देवदर्शनासाठी मोठी गर्दी होती. सोमवार दिनांक 15 रोजी पहाटे दोन वाजता देवाचे मानकरी पेशवे इनामदार तसेच खोमणे, माळवदकर पाटील यांनी इशारा करताच पालखी सोहळ्याला प्रारंभ झाला. या वेळी देवसंस्थानच्या वतीने बंदुकीच्या फैरी झाडून आणि हवाई फटाक्यांची आतषबाजी करून सोहळ्याला सलामी देण्यात आली. पालखीसमोर निशाण, छत्रचामरे अब्दागिरी तसेच घडशी समाजबांधवांच्या वतीने सनईचे मंगलमय सूर निनादत होते. पहाटे दोन वाजता जेजुरी गडावरून पालखी सोहळा मार्गस्थ होताना लाखो भाविक उपस्थित होते.

पालखी सोहळ्याची मंदिर प्रदक्षिणा होताच भंडारगृहातील श्रीखंडोबा व म्हाळसादेवीची उत्सवमूर्ती पालखीत ठेवण्यात आली व पालखी सोहळा गडावरून निघताच हजारो भाविकांनी 'येळकोट येळकोट जय मल्हारचा जयघोष करीत खंडोबा देवाचे लेणं असणारा पिवळ्या जर्द भंडाऱ्याची उधळण केली. संपूर्ण गड परिसर भंडाऱ्याने न्हाऊन निघाला. देवा तुझी सोन्याची जेजुरीचा प्रत्येय भाविकांनी या वेळी अनुभवला. या वेळी श्री मार्तंड देवसंस्थानचे विश्वस्तांसह समस्त पुजारी,श्री खंडोबा पालखी सोहळा खांडेकरी मानकरी ग्रामस्थ मंडळ ट्रस्टचे हजारो सेवेकरी,सहभागी झाले होते.

जेजुरी गडावरून मार्गस्थ झालेला पालखी सोहळा पायरी मार्गावरून बानुबाई मंदिर मार्गे, नंदी चौक मार्गाने पुढे जाऊन ऐतिहासिक मल्हार गौतमेश्वर छत्री मंदिरात विसावला, त्यानंतर गावातून सोहळा मिरवत कऱ्हा नदीकडे मार्गस्थ झाला. वजनाने प्रचंड जड असलेली पालखी खांद्यावर घेऊन सुमारे पाच किलोमीटरचे अंतर पूर्ण केले. सकाळी सात वाजता पालखी सोहळा कऱ्हा नदीवरील रंभाईशिंपीन कट्ट्यावर स्थिरावला. कऱ्हा नदीवर उत्सव मूर्ती समोर रुद्र आवर्तन व मंत्रघोष करण्यात आला.मानकरी व भाविकांनी उत्सवमूर्तीना विधिवत दही, दूध व कऱ्हास्नान घातले. या वेळी एक लाख भाविकांनी कऱ्हा स्नानाची पर्वणी लुटली. देव अंघोळीनंतर समाज आरती झाली. पालखी सोहळा परतीच्या मार्गावर घालेवाडी

दवणेमळा मार्गे जानाई मंदिरात पोहचला. जेजुरीचे ग्रामदैवत जानाई मंदिराचा विसावा झाल्यानंतर पालखी सोहळा सकाळी अकरा वाजता मानवी साखळी करीत गडावर दाखल झाला. रोजमुरावाटप (उत्सवमूर्तीचा स्पर्श करुन समृद्धीसाठी वाटप करण्यात आलेला प्रसाद) होऊन सोहळ्याची सांगता झाली.

सोमवती अमावास्येनिमित्त जेजुरी गडावरील श्री खंडोबा मंदिरासह परिसरात आकर्षक विद्युतरोषणाई करण्यात आली होती. या रंगबिरंगी रोषणाईच्या लखलखाटाने संपूर्ण गड परिसर उजळून निघाला होता. मुख्य खंडोबा मंदिर गाभाऱ्यात विविध फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

जेजुरी गडापासून ते पाच किलोमीटर अंतरावर असणाऱ्या कऱ्हा नदीपर्यंत भाविकांची मोठी गर्दी पाहण्यास मिळाली.

श्री खंडोबा पालखी सोहळा खांदेकरी,मानकरी,ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष ,पदाधिकारी,श्री.मार्तंड देवसंस्थान,जेजुरी पोलिस स्टेशन,जेजुरी नगरपरिषद व ग्रामस्थ यांनी केलेल्या उत्कृष्ट नियोजनामुळे सोमवती पालखी सोहळा उत्साहात संपन्न झाला.

# नेतृत्व विकासासाठी 'नारीदृष्टी' उपक्रम महत्त्वपूर्ण

## उच्च शिक्षणात महिलांनी प्रशासकीय व संशोधन क्षेत्रात पुढे यावे – मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील

**मुंबई (दै. संध्या)**

■ MSFDAच्यावतीने आयोजित नारीदृष्टी निवासी कार्यक्रमाचे उद्घाटन



राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रातील महिला प्राध्यापकांच्या क्षमता विकासास चालना देण्यासाठी आणि त्यांच्यातील नेतृत्व गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA), पुणे यांच्या वतीने 'नारीदृष्टी' (Nurturing Visionary Women Leaders for Transformation in Academia) या विशेष पाच दिवसीय निवासी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे ऑनलाईन उद्घाटन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाला उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, सहसचिव संतोष खोरगडे, सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे तसेच विविध क्षेत्रांतील महिला, विद्यार्थी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, उच्च शिक्षण क्षेत्रातील महिला प्राध्यापकांनी आता केवळ अध्यापनापुरते मर्यादित न राहता संशोधन, प्रशासन, शैक्षणिक धोरण निर्मिती आणि संस्थात्मक नेतृत्व या क्षेत्रांतही सक्रिय पुढाकार घेऊन महिलांनी या क्षेत्रात पुढे यावे असे आवाहन करून 'नारीदृष्टी'सारखे उपक्रम महिला प्राध्यापकांमध्ये आत्मविश्वास वाढविण्यास आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठे परिवर्तन घडविण्यास निश्चितच उपयुक्त ठरतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात नारीशक्तीला केंद्रस्थानी ठेवून विविध धोरणे आणि उपक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. शिक्षण, विज्ञान, प्रशासन, उद्योग आणि संरक्षण अशा सर्वच क्षेत्रांत महिलांनी आपली क्षमता सिद्ध केली आहे. 'ऑपरेशन सिंदूर' संदर्भातील माहिती देशासमोर मांडण्यासाठी महिलांनी घेतलेली पत्रकार परिषद ही राष्ट्रीय निर्णय प्रक्रियेत महिलांच्या सक्षम भूमिकेचे आणि बदलत्या भारतातील त्यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाचे उत्तम उदाहरण आहे असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी यावेळी सांगितले. डॉ. शैलेंद्र देवळाणकर म्हणाले, "एकाच दिवशी चार महत्त्वपूर्ण कार्यक्रमांचे उद्घाटन होणे ही MSFDA साठी अभिमानाची बाब आहे. 'नारीदृष्टी' महिला नेतृत्वाला नवी दिशा देईल, तर तीन FDP कार्यक्रम प्राध्यापकांना तंत्रज्ञान, अनुभवाधारित अध्यापन आणि परिणामाधारित शिक्षणामध्ये अधिक सक्षम करतील.

NEP 2020 च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हे कार्यक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.MSFDA च्या या उपक्रमांमुळे महाराष्ट्रातील उच्च शिक्षण संस्था राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि स्पर्धात्मक बनतील. या पाच दिवसीय निवासी कार्यक्रमामध्ये राज्यातील विविध विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील महिला प्राध्यापक सहभागी झाल्या आहेत. या कालावधीत महिला प्राध्यापकांसाठी खालील महत्त्वपूर्ण विषयांवर तज्ज्ञांद्वारे विशेष मार्गदर्शन केले जाणार आहे:

# संपादकीय

मणिपूर, सिक्कीमसारखी छोटी राज्ये सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेवर अधिक खर्च करत असताना महाराष्ट्रासारखे प्रगत राज्य त्यावर कमी खर्च करते. त्याने सामान्यांच्या खिशावरील आरोग्यभार वाढतो. भारताची अर्थव्यवस्था जगातील वेगवान अर्थव्यवस्थांपैकी एक मानली जाते. देशाच्या आर्थिक प्रगतीत महाराष्ट्राचे योगदान सर्वाधिक आहे. मात्र, या आर्थिक स्थितीच्या पार्श्वभूमीवर, राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था इतकी आजारी का? हा प्रश्न पडतो. आर्थिक समृद्धी आणि आरोग्य क्षेत्रातील प्रगती यांचा थेट संबंध असतो, असा सर्वसाधारण समज आहे; परंतु नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या

## खिशावरील आरोग्यभार

विविध अहवालांतून, भारतातील विविध राज्यांतील याचे चित्र स्पष्ट झाले आहे. आर्थिकदृष्ट्या आणि लोकसंख्येच्या दृष्टीने महाराष्ट्रापेक्षा लहान असलेली मणिपूर, मिझोराम, सिक्कीम, त्रिपुरा आणि केरळ ही राज्ये सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये पुढे असल्याचे दिसते. जागतिक आरोग्य संघटनेनुसार सार्वजनिक आरोग्यावरील खर्च जीडीपीच्या किमान ५ टक्के व राष्ट्रीय आरोग्य धोरण २०१७ नुसार किमान २.५ टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार मणिपूरने राज्याने सकल राज्य उत्पन्नाच्या (जीएसडीपी) सुमारे ५.५ टक्के, मिझोरामने ४.५ टक्के, त्रिपुराने आणि सिक्कीमने सुमारे ४ टक्के खर्च आरोग्यावर केला असल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या नॅशनल हेल्थ अकाऊंट्स (एनएचए) २०२२-२३ अहवालातून समोर येत आहे. तर आर्थिकदृष्ट्या प्रगत महाराष्ट्राचा आरोग्यावरील खर्च केवळ दीड ते दोन टक्क्यांच्या दरम्यान राहिला. सिक्कीम, मिझोराम, मणिपूर, त्रिपुरा आणि केरळ राज्याची लोकसंख्या कमी असली, तरी त्यांनी आरोग्याला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवले आहे. त्यामुळे या राज्यांच्या काही महत्त्वाच्या आरोग्य निर्देशांकांमध्ये महाराष्ट्रापेक्षा चांगली सुधारणा झाल्याचे दिसते. आरोग्यसेवांची उपलब्धता, गुणवत्ता आणि सार्वजनिक गुंतवणूक यासाठी राज्य सरकारे थेट जबाबदार आहेत. अशा परिस्थितीत महाराष्ट्रासारख्या आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्यात सार्वजनिक आरोग्यावरील खर्च कमी कमी असणे, हे चिंताजनक आहे. हा केवळ आर्थिक प्रश्न नसून, तो विकासाच्या धोरणात्मक प्राधान्यक्रमांचा आरसा आहे. महाराष्ट्रात आरोग्य क्षेत्रातील गुंतवणूक प्रामुख्याने वैद्यकीय महाविद्यालये, शहरी भागातील मोठी रुग्णालये आणि सार्वजनिक खासगी भागीदारी यावर होताना दिसते. प्राथमिक व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवांच्या बळकटीकरणाकडे काणाडोळा होतो. परिणामी, ग्रामीण आणि आदिवासी भागांमध्ये आरोग्य सेवांची गुणवत्ता आणि उपलब्धतेची असमानता कायम राहिली आहे. सार्वजनिक आरोग्यावरील कमी खर्चाचा पहिला परिणाम म्हणजे आरोग्यसेवांसाठी खासगी आरोग्य क्षेत्रावरील वाढते अवलंबित्व. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या अहवालानुसार, देशाच्या ग्रामीण भागातील सुमारे ५८ टक्के आणि शहरी भागातील ६५ टक्के नागरिक खासगी क्षेत्रातून आरोग्य सेवा घेतात. महाराष्ट्रात तर हे प्रमाण अधिक आहे. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील अपुऱ्या निदान सुविधा, रिक्त पदे, औषधांची अपुरी उपलब्धता यामुळे नागरिक खासगी सेवांकडे वळत आहेत. परिणामी, आरोग्य खर्चाचा भार थेट नागरिकांच्या खिशावर पडत असून या थेट खर्चाचे ('आऊट ऑफ पॉकेट एक्स्पेंडिचर') प्रमाण कमी होण्याऐवजी वाढतच चालले आहे. महाराष्ट्रात नागरिक सार्वजनिक आरोग्य सेवांमध्ये फक्त १८.६ टक्के सहभाग घेत असून, खासगी रुग्णालयांवरील अवलंबित्व अधिक (७७%) असल्यामुळे कुटुंबांवरील आर्थिक भार आणखी वाढत आहे. 'एनएसएस'च्या अहवालानुसार, महाराष्ट्रात सार्वजनिक रुग्णालयातून उपचाराचा सरासरी खर्च सुमारे सहा हजार ते आठ हजार रुपये येतो. तर खासगी रुग्णालयात हाच खर्च ४० हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत जातो. परिणामी महाराष्ट्रात अनेक कुटुंबांना गंभीर आजाराच्या उपचारासाठी कर्ज काढावे लागते, बचत खर्च करावी लागते किंवा मालमत्ता विकावी लागते. केवळ आरोग्यावरील खर्चामुळे दर वर्षी साडेपाच कोटी लोक दारिद्र्येषेखाली जातात.

## संस्कृत सुभाषित

वीणा वंशश्चन्दनं चन्द्रभास – श्चन्द्राभासा यौवनस्थास्तरुण्य:।
नैतद्रम्यं क्षुत्पिपासातुराणां सर्वारम्भास्तण्डुला प्रस्थमूला:।।

अर्थ – भूक आणि तहानेने व्याकूळ झालेल्या माणसाला वीणावादन,चंद्राचे शीतल चांदणे,चंदनाचा सुगंध, चंद्रासारखा चेहरा असणाऱ्या तरुणी यांचे आकर्षण वाटत नाही. मापटेभर तांदळाच्या भाताने क्षुधा शमल्यानंतरच त्याला इतर गोष्टींमध्ये स्वारस्य वाटते.

## गुरु वचन

### सौंदर्य व प्रेम

सौंदर्य व प्रेम एकमेकांवर आधारलेले आहेत, जिथे प्रेम आहे तिथे सौंदर्य आहे. सत्यम, शिवमसोबत परमात्माचे तिसरे वैशिष्ट्य सुंदरम असल्याचे सांगण्यात आले आहे. ते सुंदरच नाही पण सौंदर्यांचा मुळ स्त्रोत त्याचे अस्तित्व, सौंदर्य शाश्वत आहे. जग त्या सौंदर्याचे प्रत्यक्ष दिग्दर्शन आहे. शाश्वत सौंदर्याचे कलम त्यातूनच प्रस्फुटित होऊन सर्व जड–चेतनात सौंदर्य अभिसिंचन करते. वैदिक दर्शनानुसार रूपम रूपम प्रतिरूपो बभूव म्हणजे प्रकृतीची अव्यक्त अवस्था दर्पण आहे ज्यात चैतन्य ज्योतीचा आभास होतो. जितके मूर्त रूप आहेत ते सर्व त्या परब्रह्मरूपी ज्योतीचे प्रतिबिंब आहेत. त्याच एक परमात्म्याच्या परम ज्योतीने सुर्य व चंद्र प्रकाशमान आहेत. रात्र आपल्या असंख्य नेत्ररूपी ताऱ्यांनी त्या सौंदर्याचे दर्शन करते. परमात्म्याच्या अंश असल्याच्या नात्याने जीवात्मा सुद्धा प्रत्येक सुंदर वस्तुकडे आकर्षित होतो. प्रकृतीचे मनोरम दृश्य, हिरवळ, फुलांचे उद्यान, नदी, पर्वत इत्यादी पाहून कुणाचे मन फुलणार नाही? सौंदर्याकडे आकर्षण अंतरतम्ची अभिव्यक्ती आहे, जी शाश्वत सौंदर्याचा शोध घेते. कबीर त्या शाश्वत सौंदर्याला चोहीकडे पाहतात– लाली मेरे लाल की, जित देखौं तित लाल। सौंदर्य प्रेमींनी त्या सौंदर्यास नारीत पाहिले व त्यात ब्रह्माची कल्पना केली. असे मधुर व कोमल अवलंबन ब्रह्माव्यतिरिक्त दुसरे कुणीही असू शकत नाही कारण ते प्रेमरूप आहे, परम सुंदर आहे व त्याचे सौंदर्य विश्वाच्या चराचरात आहे. त्या दिव्य सौंदर्याचा साक्षात्काराने अज्ञानरूपी अंधार नष्ट होतो, जन्म–जन्माचे पाप धुतले जातात. प्रेम मिळवण्यासाठीच ब्रह्माने सृष्टीची रचना केली व जीवाच्या हृदयात प्रेम निर्माण केले. एकीकडे हे प्रेम साधकाच्या हृदयातील सर्व कलुषित भावना, वासना व आकांक्षा नष्ट करुन हृदय स्वच्छ करते. दुसरीकडे त्याच्या हृदयास त्या अनंत सौंदर्य रसाने परिपूर्ण करते. प्रेम खऱ्या प्रेमीस कधीच थकू देत नाही. ते त्यास नित्य नवीन शाश्वत सौंदर्याची अनुभूती करुन देत राहते.

## उपदेशकथा

### मानवता हा परमधर्म आहे

एका राज्यात परमेश्वराला प्रसन्न करण्यासाठी पशुबळी देण्याची प्रथा चालत असे. आपल्या सुखसमृद्धीसाठी, वैभवासाठी परमेश्वराला प्रसन्न करून घेण्यासाठी मेंढ्या, डुक्कर, कोंबडे मारून बलिकर्म करण्यासाठी फार मोठी माणसं पुढे येत. प्राणीवधाची, अधर्माची चीड असलेला एक तरुण पुढे आपल्या गुणांमुळं, शौर्यामुळं राजा होतो. तो सर्वांना बोलावतो व म्हणतो, 'हे राज्यपद मिळविण्यासाठी मी देवाला नवस केला होता. मी म्हटलं होतं, जे लोक अधर्मात गुंतलेले आहेत; हिंसेवर विश्वास ठेवतात, बलिकर्मावर विश्वास ठेवतात त्यांचाच बळी घ्यायचा आणि माझा नवस पूर्ण करायचा.' हिंसा, पशुबळी देणाऱ्यांना राजाचं बोलणं ऐकून चांगलाच पश्चाताप झाला. ते सर्व राजाला शरण गेले. प्राणीवध करणं हाच मोठा अपराध आहे हे त्यांना उमगलं. परमेश्वराला प्रसन्न करायचं तर मानवधर्म पाळला पाहिजे याची जाणीव त्यांना झाली.

कथा उपदेश : निरपराध, मूक पशुहत्या करून कधीही परमेश्वर प्रसन्न होणार नाही. मानवता हाच खरा धर्म आहे.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:आर्द्रा १६:१२:०४ |
| १६ जून २०२६ | योग:वृद्धि २४:३४:१२+ |
| मंगळवार | करण:बालव १४:३९:२५ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:कौलव |
| निज ज्येष्ठशके | २४:५२:३९+ |
| संवत्– १९४८ | सूर्य:मिथुन |
| संवत्सर –पराभवनाम | चन्द्र:मिथुन |
| अयन– उत्तरायणारंभ | हिजरी सन् – १४४७ |
| मास– निज ज्येष्ठ | मुस्लिम मास – जिल्हेज |
| ऋतु– सौर ग्रीष्म | तारीख – ३० |
| शुक्ल पक्ष | विशेष |
| तिथि:द्वितीया | चंद्रदर्शन |
| २४:५२:३९+ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९८२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2 | | | 7 | 9 | | |
| 3 | 9 | | 1 | 4 | | | | 2 |
| | | | | 9 | | | 3 | 1 |
| 7 | 5 | | 3 | 1 | | 8 | | |
| | | 4 | 8 | | 9 | 1 | | |
| | | 1 | | 2 | 6 | | 9 | 7 |
| 1 | 4 | | | 6 | | | | |
| 9 | | | | 8 | 1 | | 6 | 5 |
| | | 8 | 9 | | | 2 | | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. ९८१ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 1 | 2 | 9 | 5 | 3 | 4 | 8 | 6 |
| 3 | 8 | 6 | 1 | 2 | 4 | 5 | 7 | 9 |
| 9 | 5 | 4 | 8 | 6 | 7 | 1 | 2 | 3 |
| 1 | 9 | 5 | 7 | 8 | 6 | 3 | 4 | 2 |
| 8 | 2 | 3 | 4 | 1 | 9 | 7 | 6 | 5 |
| 4 | 6 | 7 | 2 | 3 | 5 | 9 | 1 | 8 |
| 6 | 4 | 1 | 3 | 9 | 2 | 8 | 5 | 7 |
| 5 | 7 | 9 | 6 | 4 | 8 | 2 | 3 | 1 |
| 2 | 3 | 8 | 5 | 7 | 1 | 6 | 9 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९०३ – पेप्सी कोला कंपनीची स्थापना.
- १९२४ – इंग्लंडविरुद्ध दक्षिण आफ्रिकेचा पूर्ण संघ ४८ मिनिटात ३० धावावर बाद झाला.
- १९६२ – सायगन येथे २ अमिरेकी अधिकाऱ्याची हत्या करण्यात आली.
- २००८ – चीनमध्ये पुर आणि भूस्खलनात ७६ लोक मारले गेले.

### राष्ट्रीय

- १८५८ – एकोणीसशे सत्तावनच्या संग्रामातील मोरारची लढाई .
- २००६ – मुंबईत तीन नायजेरीयन नागरिकांना १५ लाखाच्या कोकेनसह अटक.
- २००८ – देशातील अग्रगण्य वृत्तपत्र दैनिक भास्करने क्रिकेटपटू महेंद्रसिंग धोनीला आपला ब्रॅण्ड अम्बॅसडर म्हणून नियुक्त केले.

### जन्म

- १९०२ – अमेरिकन वैज्ञानिक जॉर्ज गेलॉर्ड सिम्पसन याचा जन्म.
- १९१५ – अमेरिकन वैज्ञानिक जॉन टुकी याचा जन्म.
- १९१७ – अमेरिकन छायाचित्रकार इरवीन पेन याचा जन्म.
- १९२८ – लंकेसटर विद्यापीठाचे कुलपती हैरोल्ड हनमन याचा जन्म.

### निधन

- १९२५ – ज्येष्ठ नेते व बंगालमधील नामवंत कायदेपंडित देशबंधू चित्तरंजन दास यांचे निधन.
- १९३० – अमेरिकन संशोधक एल्मर अँब्रॉझी स्पेरी यांचे निधन.
- १९७७ – मराठी रंगभुमीवरील लोकप्रिय गायक, नट श्रीपाद गोविंद नेवरेकर यांचे निधन.

## : SMS :

Zindagi aik ajeeb
paheli hai.
?
?
?
?
Keypad dabana
bas karo..
Is k dabane se
Solve nahi ho gi.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.२ | २५.३ |
| अहमदनगर | ३७.२ | २४.९ |
| अकोला | ४२.२ | ३१ |
| अमरावती | ४१.६ | ३०.७ |
| बीड | ४४.३ | ३२ |
| भंडारा | ४३.६ | ३१.९ |
| बुलढाणा | ४०.५ | २६.४ |
| चंद्रपूर | ४४.४ | ३२.२ |
| चेन्नई | ४२.३ | ३०.५ |
| नवी दिल्ली | ४०.८ | ३०.६ |
| धुळे | ४१.१ | ३०.३ |
| गोंदिया | ४२.३ | ३१.३ |
| जळगाव | ४२.५ | २९.९ |
| कोल्हापूर | ३५ | २४.८ |
| लातूर | ३७.६ | २५.५ |
| मुंबई | ४०.६ | ३६.९ |
| नागपूर | ४१.८ | ३०.७ |
| नांदेड | ४०.३ | २७.३ |
| नंदूरबार | ३७.७ | २७.१ |
| नाशिक | ३६.२ | २५.६ |
| पुणे | ३४ | २४.२ |
| पंढरपूर | ३९.४ | २६.१ |
| सातारा | ३५.८ | २३.७ |
| सांगली | ३६.७ | २५ |
| सोलापूर | ३८.८ | २७.१ |
| वर्धा | ४२.९ | ३१.७ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा : उत्तर कौटुंबिक उत्साह, गोड वार्तालाप व आनंदाच्या गाठीभेटी यातून उत्साह संचरेल.

**वृषभ :** शुभ रंग : नीळा, अनुकूल दिशा : पश्चिम स्वत:ची तब्येत योग्य साथ देत असेल तर काही नवे संकल्प करणे हितकारक ठरेल.

**मिथुन :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : पश्चिम व्यावसायिक प्रश्नामध्ये यश मिळेल. कोणाशीही वादविवाद वाढविणे नुकसानकारक ठरेल.

**कर्क :** शुभ रंग : जांभळा, अनुकूल दिशा : पश्चिम खाण्यापिण्याची बंधने विसरू नका. कामकाजासंबंधी आपला शब्द प्रमाण मानला जाईल.

**सिंह :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : पश्चिम शेजाऱ्याशी संबंध सलोख्याचे होतील. नुसते गप्पाष्टकांत अडकणाऱ्या मैत्रिणीपासून सावध रहा.

**कन्या :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : उत्तर खेळात प्रविण्य मिळेल. लहान लहान कोर्सेस आपले व्यक्तिमत्व फुलविणारे ठरतील.

**तुळ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण बोलण्यातील कटुता अहंकाररहित शब्दांनी टाळण्याचा प्रयत्न करा.

**वृश्चिक :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण वैवाहिक साथीदाराचा अगदी पत्नीचाही सल्ला अजिबात विसरू नका.


**धनु :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा : उत्तर ताणतणावामुळे आजारपण उद्भवणार नाही याची काळजी घेणे.

**मकर :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पश्चिम वेळ देणे अत्यंत हितकारक ठरेल. ठरविलेले कार्यक्रम वेळेत पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध रहा.

**कुंभ :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण आपले हिशेब चोख ठेवावेत. संशयाला कोठेही जागा राहणार नाही असे बोलणे व कृती ठेवावी.

**मीन :** शुभ रंग : केसरी, अनुकूल दिशा : दक्षिण काही सूचक स्वप्ने भविष्याचा कानोसा देणारी ठरतील. परदेश प्रवासाचे स्वप्न पुरे होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९८२



### आडवे शब्द

१. नसता संबंध जोडणे (वाक्य प्रचार)
७. हिंमत, धैर्य
१०. मालाची विक्री
११. नवविवाहितेच्या गळ्यातील एक दागिना
१२. उपस्थित
१४. अभिनय म्हणजे जणू ---- प्रवेश!
१७. वर्ष, साल
१८. तुझे (कवितेत)
१९. रक्षाबंधन
२०. मरेपर्यंत
२२. लिंबू–पाणी
२३. आकाराची उभी रेघ
२४. धाक
२६. कवडीमोल
२८. क्रिकेटमधील धाव
३०. समोरासमोरची चकमक
३२. श्वसनेंद्रिय
३३. रुग्णालय
३५. वर–वधूची मिरवणूक
३७. पैसा आणि बळ यांचा खेळ!
३८. बोजा, वजन
३९. टप्पा, अंतर
४०. विजांचा आवाज
४१. श्रीकृष्णाचे वडील व आई
४३. देव
४४. स्वीकारलेले अवघड काम
४७. देशी 'फ्रीज'!
४८. कागदाचे मोजमाप
५१. तपासनीस (इंग्रजी)
५२. नवीन, न वापरलेली
५५. रामदासस्वामींचा जन्मदिन
५७. एखादे काम करण्यास समर्थ असलेला, क्षमता असलेला
५९. पांढऱ्या टोपीचे गवत
६१. जागृती
६२. शिक्का
६४. श्रीमंत
६७. कैद
६९. लहानच्या विरुद्ध
७०. नासधूस, नासाडी
७३. नरम स्वभावाचा
७४. घराचे धाबे, माळा
७६. चानी
७७. सान
७८. भूकंप
७९. अंत:करण

### उभे शब्द

१. वस्ती
२. हत्तीची ललकारी
३. चकचकीत
४. पाणी साठविण्याचे पात्र (इंग्रजी)
५. आवडता, प्रिय
६. रंग
७. द्रव्य, संपत्ती
८. माझे
९. भरपूर चोप देणे (वाक्य प्रचार)
११. कन्या, मुलगी
१३. एक गळीत धान्य
१४. दुर्दशा
१५. नाद, स्वर, आवाज
१६. वेदना
१७. याशिवाय उद्धार नाही!
१९. वहिवाट, जाणे–येणे
२१. दालचिनी
२३. पाण्याचा पाट
२५. व्रत, नेम
२६. मर्कट
२७. 'आनंददायी' मिष्टान्न
२९. नवरामुलगा
३१. भ्रमर, भुंगा
३२. न आवडणाऱ्या व्यक्तीचे गुणही दोष वाटतात याअर्थी वाक्यप्रचार
३४. जनगणना
३६. लाल व निळा यांच्या मिश्रणातून तयार होणारा रंग
३७. सकसच्या विरुद्ध
३८. किंमत
४२. फळ–पान यांना झाडाशी जोडणारा भाग
४३. सुख देणारी
४५. धनादेश (इंग्रजी)
४६. उत्तराधिकारी
४९. सहाय्यक
५०. आपले राष्ट्रगीत
५२. नाजूक
५३. प्रत्येक दिवशी
५४. फाल्गुनातील पंचमीचे विशेषण
५६. शिक्षा
५८. माफी
५९. थंडी
६०. मजेने रेंगाळत, --- गमत
६३. आंब्याची पोळी
६५. श्रीकृष्णाचे एक नाव
६६. प्रवेश करणे
६८. हद्द (करणे)
७१. जिवलग
७२. मऊ
७५. खून, हत्या

### जम्बो शब्दकोडे क्र. ९८१ चे उत्तर

आडवे उत्तर १.दैववान ५.विनाकारण ८.अंतरपाट १२.वसाहत १३.लट १४.वा. १५.नस १६.नरमगरम १७.कायापालट १८.नवतर २०.तीट २१.साल २२.नळ २३.अजब २६.खवा २७.हिमालय २९.रकमपात ३२.सरबत ३५.सुवार्ता ३६.नल ३८.सतार ३९.बावनकशी ४०.कर ४२.शाळा ४३.आई ४४.लहरबहर ४६.पाणीदार ४८.परत ४९.विरस ५०. समाधान ५१.पुरता ५३.वानर ५४.वरमणे ५६.अमुक ५७.रवरव ५९.माती ६०.पालखी ६१.खवाट ६२.मीलन ६३.घाम ६४.कडवा ६६.नवल ६७.धरणे धरणे ६८.रसद ७०.रागीट ७१.मदन ७२.रस्ता ७३.खार

उभे उत्तर : १.दैवहीन २.वसा ३.वाहनतळ ४.नत ५.विहीर ६.कालगती ७.रटरट ९.तनया १०.रसपान ११.टवटवी १७.कालपरवा १९.वनवास २३.अवांतर २३अ.बहिणाबाई २४.साय २५.सोपान २८.लहानसर ३०.कर्ताकरविता ३१.तलवार ३३.रस ३४.बतावणी ३५.सुशील ३७.मशागत ४१.रबर ४३.आरमार ४५.हसतमुखी ४६.पाश ४७.दासनवमी ४८.पनवती ५१.पुणे ५२.परवानगी ५३.वार ५५.मधोमध ५६.अलवार ५८.वटवट ५९.मानधन ६०.पाड ६३.घाणेरी ६४.कणेर ६५.उदर ६९.सखा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### श्रमदान मारुती मंडळाच्या 'भव्य वाचन स्पर्धेचा' बक्षीस वितरण सोहळा संपन्न

■ नगरसेवक नामदेव माळवदे आणि राजेंद्र काकडे यांच्याकडून 'पूर्व पुण्यातील आदर्श मंडळ' म्हणून गौरव

पुणे (दैनिक संध्या) : श्रमदान मारुती मंडळ, पुणे अंतर्गत असलेल्या श्रमदान ग्रंथालयाच्या वतीने आयोजित 'भव्य वाचन स्पर्धेचा' बक्षीस वितरण समारंभ १४ जून २०२६ रोजी १००, महात्मा फुले पेठ येथे उत्साहात संपन्न झाला. स्पर्धेचे हे यशस्वी ८ वे वर्ष असून, मंडळाच्या माननीय अध्यक्षांच्या राजेंद्र कोंढारे यांचे मार्गदर्शनाने व प्रेरणेने ही अभिनव संकल्पना सुरू करण्यात आली आहे. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक नामदेव माळवदे आणि राजेंद्र काकडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निलेश जाधव यांनी केले. प्रमुख पाहुण्यांनी मंडळाच्या उपक्रमांचे कौतुक करत, "श्रमदान मारुती मंडळ हे पूर्व पुण्यातील एक 'आदर्श मंडळ' आहे," अशा शब्दांत गौरव केला व भविष्यातील उपक्रमांसाठी सर्वतोपरी मदतीची ग्वाही दिली.

स्पर्धेचे प्रायोजक आणि विजेते बालवाचक:

सायकल (प्रायोजक: उद्योजक प्रसाद भिमाले) - अर्जुन भालगारे

स्मार्ट वॉच (प्रायोजक: शिवसह्याद्री चॅरिटेबल फौंडेशन) - निर्वेद गायकवाड, आर्यन पवार, प्रियांश टक्कर,

स्टडी टेबल (प्रायोजक: शिरीष बोजा) - चित्रा गाडेकर, सावी भागणे, श्रेयश मलपेद्दी,

स्कूल बॅग (प्रायोजक: मोहनीश सावंत) व कंपास (उत्तेजनार्थ) चे देखील वितरण मान्यवरांच्या हस्ते झाले.

नियोजन व सहकार्य:

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते शिरीष बोजा, अजय कोंढारे, अनिल कुडले, मोहनीश सावंत, राहुल आवटे, शेखर पुजारी आणि ग्रंथपाल अथर्व कोळवण, सुवर्णा कोंढारे, दीपाली गायकवाड यांचे मोलाचे नियोजन लाभले. सिद्धेश्वर पेंटर यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला परिसरातील पालक आणि बालवाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### आरोग्यदूत मंगेशजी चिवटे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

■ आरोग्य समन्वयक प्रवीण सोनू माकर यांच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप

गोजूबावी (दैनिक संध्या) : शिवसेना मुख्य नेते आदरणीय मा.श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांचे विशेष कार्यकारी अधिकारी व उपमुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्ष प्रमुख मा.श्री.मंगेशजी चिवटे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त प्रविण सोनू माकर यांच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळा,अंगणवाडी शाळा गोजुबावी शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.शाळेचा पहिला दिवस असल्यामुळे सरस्वती फोटोचे पूजन करण्यात आले. उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळेस गोजुबावी गावच्या सरपंच प्रतिक्षा सचिन भोसले,सचिन भोसले,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल दत्तात्रय आटोळे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक कल्याण विठ्ठल गवळी,आशा सुखदेव वाघमारे,प्रिया अमोल नाळे,अंगणवाडी शिक्षिका कामिनी सत्यवान भोसले,अलका लालासो गटकळ,अंगणवाडी मदतनीस धनश्री सचिन गावडे,जयश्री कैलास आटोळे,विद्यार्थी,पालक,पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थिती होते.यावेळी सर्वांच्या वतीने मंगेशजी चिवटे साहेब यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.


### दीड महिन्यांच्या बाळाच्या पचनसंस्थेत अडकलेली हेअरपिन काढून वाचवला जीव

पुणे (दैनिक संध्या) : मणिपाल हॉस्पिटल, खराडी येथील डॉक्टरांनी दीड महिन्यांच्या बाळाच्या पचनसंस्थेत अडकलेली हेअरपिन तातडीच्या एंडोस्कोपिक प्रक्रियेद्वारे यशस्वीरित्या काढून संभाव्य गंभीर गुंतागुंत टाळली. घरी खेळत असताना चुकून हेअरपिन गिळल्यामुळे बाळाला घटनेनंतर सुमारे दोन तासांनी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तातडीने करण्यात आलेल्या पोटाच्या एक्स-रेमध्ये ही हेअरपिन पोटाच्या खालच्या भागात किंवा लहान आतड्याच्या सुरुवातीच्या भागात पोहोचल्याचे आढळून आले. हेअरपिन उघडी असल्याने पोट किंवा लहान आतड्याला छिद्र पडण्याचा धोका निर्माण झाला होता. त्यामुळे या प्रकरणाकडे वैद्यकीय आणीबाणी म्हणून पाहण्यात आले. विशेष प्रकारच्या टूथ फोर्सेप्सच्या साहाय्याने ही हेअरपिन पचनसंस्थेला कोणतीही इजा न होता यशस्वीरित्या बाहेर काढण्यात आली. या प्रकरणाविषयी माहिती देताना मणिपाल हॉस्पिटल, खराडी, पुणे येथील गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट सल्लागार डॉ. आदित्य बोरावके म्हणाले , "या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन आम्ही तातडीने एंडोस्कोपी करण्याचा निर्णय घेतला. प्रक्रियेदरम्यान ड्युओडेनमच्या दुसऱ्या भागापर्यंत (D2) परकीय वस्तू आढळली नाही. साधारण गॅस्ट्रोस्कोपीची मर्यादा इथपर्यंतच असते. मात्र आम्ही काळजीपूर्वक पुढे जाऊन लहान आतड्याच्या सुरुवातीच्या भागात तपासणी सुरू ठेवली आणि अखेरीस ड्युओडेनमच्या चौथ्या भागात (D4) ही हेअरपिन आढळून आली. " ते पुढे म्हणाले, " लहान बाळांनी परकीय वस्तू गिळल्यास ती वैद्यकीय आणीबाणीची परिस्थिती ठरू शकते, विशेषतः वस्तू टोकदार किंवा धारदार असल्यास. या प्रकरणात हेअरपिन उघडी असल्याने आतड्याला छिद्र पडण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला होता. ही वस्तू ड्युओडेनमच्या खूप आतपर्यंत गेल्यामुळे नियमित एंडोस्कोपीच्या आवाक्याबाहेर होती. योग्य वेळी हस्तक्षेप केल्यामुळे कोणतीही गुंतागुंत होण्यापूर्वी आम्हाला ती सुरक्षितपणे बाहेर काढता आली ." प्रक्रियेनंतर बाळाची प्रकृती स्थिर होती. चार तासांनंतर त्याला तोंडावाटे आहार देण्यास सुरुवात करण्यात आली. बाळाने आहार चांगल्या प्रकारे घेतला आणि दुसऱ्याच दिवशी त्याला उत्तम प्रकृतीत रुग्णालयातून घरी सोडण्यात आले. मणिपाल हॉस्पिटल्स, संचालक डॉ. अमित माने म्हणाले, " लहान मुलांनी चुकून कोणतीही परकीय वस्तू गिळल्यास तात्काळ वैद्यकीय सल्ला घेणे किती महत्त्वाचे आहे, हे हे प्रकरण अधोरेखित करते. एवढ्या लहान बाळाच्या शरीरातून उघडी हेअरपिन यशस्वीरित्या काढून टाकणे हे आमच्या तज्ज्ञ वैद्यकीय पथकाच्या कौशल्याचे आणि अत्याधुनिक, कमी आक्रमक उपचारपद्धतींद्वारे गुंतागुंतीच्या आणीबाणीच्या परिस्थिती हाताळण्याच्या आमच्या तयारीचे उदाहरण आहे. सर्व वयोगटांतील रुग्णांना वेळेवर आणि विशेष वैद्यकीय सेवा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत ."

# 'आरोग्यदायी नैसर्गिक भातशेती' पुस्तकातून शाश्वत शेतीचा नवा मार्ग

## पाणी संवर्धन, देशी वाणांचे जतन आणि विषमुक्त अन्ननिर्मितीसाठी सामूहिक प्रयत्नांची गरज : दीपा मुधोळ-मुंडे

पुणे (दै. संध्या)




नैसर्गिक शेती, विषमुक्त अन्ननिर्मिती आणि जलसंवर्धनाचा संदेश देणाऱ्या 'आरोग्यदायी नैसर्गिक भातशेती' या पुस्तकाचे प्रकाशन वनराई संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात उत्साहात पार पडले. नैसर्गिक शेतीचे अभ्यासक, प्रयोगशील शेतकरी आणि समाजकल्याण विभागाचे सह आयुक्त प्रमोद जाधव लिखित या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

कार्यक्रमास वनराईचे विश्वस्त गिरीश गांधी, समाजकल्याण विभागाच्या आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे, कृषी प्रक्रिया व नियोजन-विस्तार विभागाचे कृषी संचालक विनयकुमार आवटे, कृषी-जैवविविधता तज्ज्ञ संजय पाटील, वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वैद्य विनायक परशुराम वैद्य खडीवाले, वनराईचे विश्वस्त सागर धारिया, सचिव अमित वाडेकर, लेखक प्रमोद जाधव उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात अमित वाडेकर यांनी कार्यक्रमामागील उद्दिष्टे स्पष्ट केली, तर सागर धारिया यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विनायक गारडे यांनी आभार मानले. लेखक प्रमोद जाधव यांनी पुस्तक निर्मितीमागील प्रेरणा आणि नैसर्गिक भातशेतीतील अनुभव मांडले. अध्यक्षीय भाषणात गिरीश गांधी यांनी देशी बियाण्यांचे संवर्धन, जैवविविधतेचे जतन आणि शाश्वत शेतीच्या प्रसारासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले.

यावेळी बोलताना दीपा मुधोळ-मुंडे यांनी डिजिटल युगात माहितीचा प्रचंड साठा उपलब्ध असला तरी ती माहिती दीर्घकाळ मनात साठवली जात नाही, असे सांगितले. पुस्तके आणि ग्रंथालये ही ज्ञान जतन करण्याची प्रभावी माध्यमे असून अशा पुस्तकांमुळे महत्त्वपूर्ण माहिती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचते, असे त्यांनी नमूद केले. आपण जे अन्न खातो त्याचा थेट परिणाम आपल्या आरोग्यावर होत असल्याने नैसर्गिक आणि सेंद्रिय शेतीकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. शेती आणि कृषी क्षेत्राविषयी आपल्याला विशेष आवड असल्याचे नमूद करताना त्यांनी शेतकऱ्यांच्या जीवनातील आनंद आणि आव्हानांचा उल्लेख केला. चांगले पीक आले किंवा वेळेवर पाऊस पडला की शेतकऱ्याला सर्वाधिक आनंद होतो, असे त्या म्हणाल्या.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पाणी संवर्धन आणि जल पुनर्भरणाचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, कमी पाण्यात पिकांचे संवर्धन करणे हे कौशल्य आणि परिश्रमाचे काम आहे. पाण्याची बचत करणे ही केवळ सरकार, प्रशासन किंवा स्वयंसेवी संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विशेषतः मराठवाड्यासारख्या भागात कमी पाऊस आणि पाण्याची टंचाई असल्याने जलसंवर्धनाला प्राधान्य देणे काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विनयकुमार आवटे यांनी अन्न, वस्त्र आणि निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा असल्या तरी अन्न ही जगण्यासाठी सर्वांत महत्त्वाची गरज असल्याचे सांगितले. त्यामुळे सुरक्षित, पोषक आणि विषमुक्त अन्ननिर्मितीसाठी नैसर्गिक शेतीचा प्रसार होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

वैद्य विनायक परशुराम वैद्य खडीवाले यांनी बदलती जीवनशैली, शेतीमधील रासायनिक कीटकनाशकांचा वाढता वापर आणि डबल पॉलिश तांदळाच्या सेवनामुळे विविध आजार कमी वयात जडत असल्याची चिंता व्यक्त केली. मात्र या समस्यांवर केवळ टीका करण्याऐवजी प्रमोद जाधव यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून सक्षम पर्याय मांडल्याचे त्यांनी सांगितले. लाल तांदळाच्या देशी जातींचा शोध, त्यांचे संवर्धन आणि अधिक उत्पादनासाठी केलेले प्रयोग हे दिशादर्शक असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमानिमित्त महाराष्ट्रातील भाताच्या सुमारे २०० देशी वाणांसह नाचणी, ज्वारी, वरई, राळा, विविध कडधान्ये आणि भाजीपाला पिकांच्या वाणांचे विशेष प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमानंतर 'नैसर्गिक भातशेती' या विषयावरील चर्चासत्रही पार पडले.

'आरोग्यदायी नैसर्गिक भातशेती' हे पुस्तक विषमुक्त अन्ननिर्मिती, सेंद्रिय कीड-रोगनाशके, पारंपरिक ज्ञान, देशी बियाण्यांचे संवर्धन, जलव्यवस्थापन आणि नैसर्गिक शेतीमागील विज्ञान यांचा सखोल वेध घेणारे मार्गदर्शक पुस्तक असून शेतकरी, संशोधक आणि नैसर्गिक शेतीची वाट निवडणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

## दिव्यांच्या लखलखाटात उजळले श्री महालक्ष्मी मंदिर

पुणे (दै. संध्या)

■ सारसबागेसमोरील श्री महालक्ष्मी मंदिरात अधिक मासानिमित्त दीप उत्सव



समई, पणत्या, फिरते दिवे आणि विविध प्रकारच्या दिव्यांनी श्री महालक्ष्मी मंदिराचा परिसर उजळून निघाला. पुरुषोत्तम मासानिमित्त मंदिरात दीप उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी फुलांची आकर्षक रंगावली देखील काढण्यात आली होती. सारसबागेसमोरील श्री महालक्ष्मी मंदिरात अधिक महिन्यात दीप उत्सव साजरा करण्यात आला. ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल, प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल यांसह विश्वस्त मंडळाने उपक्रमांचे संयोजन केले आहे. यावेळी पुणे मनपा स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भीमाले, विश्वस्त प्रवीण चोरबेले, हेमंत अर्नाळकर यांसह पदाधिकारी व मंदिराचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## विद्यार्थी दत्तक योजनेतून १५९ विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य

पुणे (दै. संध्या)



पुण्याच्या मानाच्या पहिल्या श्री कसबा गणपती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि श्री कसबा गणपती सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गेली २३ वर्षे राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थी दत्तक योजनेअंतर्गत यावर्षी १५९ गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय शुल्क व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

हॉटेल सेंट्रल पार्क, शिवाजीनगर येथे झालेल्या या कार्यक्रमास कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. हेमंत रासने, मानाचा पहिला श्री कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्री. श्रीकांत शेटे तसेच शिक्षण समुपदेशक सौ. चैत्राली कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

या योजनेचा लाभ रमणबाग, हुजूरपागा, अहिल्यादेवी, नंदादीप, कर्वे संस्था, विमलाबाई गरवारे तसेच पुण्यातील इतर अनेक नामांकित शाळांमधील विद्यार्थ्यांना मिळाला. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना व पालकांना शिक्षणाचे महत्त्व, परिश्रम आणि सातत्य याविषयी मार्गदर्शन केले.

शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शाळांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते.

गेल्या २३ वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमातून आतापर्यंत ५०० हून अधिक विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी शैक्षणिक सहाय्य मिळाले आहे. मागील वर्षी १२५ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला होता, तर यावर्षी १५९ विद्यार्थ्यांना शालेय शुल्क व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

समाजातील दानशूर व्यक्ती, संस्था आणि विविध सहकाऱ्यांच्या योगदानामुळे हा उपक्रम सातत्याने यशस्वीपणे राबविला जात असून, गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी भक्कम आधार ठरत आहे.

## विविध स्पर्धा परीक्षांतील गुणवंत विद्यार्थ्यांचा बाकलीवाल ट्युटोरियल्सतर्फे गौरव

पुणे (दै. संध्या)




अभियांत्रिकी प्रवेशासाठीच्या संयुक्त प्रवेश परीक्षेची प्रगत पातळी, राष्ट्रीय विज्ञान स्पर्धा, होमी भाभा परीक्षा तसेच दहावी-बारावी मंडळ परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा बाकलीवाल ट्युटोरियल्सतर्फे आयोजित वार्षिक गौरव सोहळ्यात सन्मान करण्यात आला.

गणेश कला क्रीडा मंच येथे झालेल्या या कार्यक्रमास सुमारे अडीच हजार विद्यार्थी व पालक उपस्थित होते. यंदाच्या संयुक्त प्रवेश परीक्षेच्या प्रगत पातळीच्या निकालात संस्थेचे ४०८ विद्यार्थी पात्र ठरले असून, देशातील नामांकित तंत्रशिक्षण व विज्ञान संस्थांमध्ये प्रवेश मिळविण्याच्या दिशेने त्यांनी वाटचाल सुरू केली आहे.

या सोहळ्यात प्रगत पातळीच्या परीक्षेत देशपातळीवरील उल्लेखनीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिके, सुवर्ण व रौप्य नाणी तसेच स्मृतिचिन्हे देऊन गौरविण्यात आले. परीक्षेत पात्र ठरलेल्या इतर विद्यार्थ्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

राष्ट्रीय विज्ञान स्पर्धा, होमी भाभा परीक्षेचे विविध टप्पे यामध्ये यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांनाही यावेळी सन्मानित करण्यात आले. तसेच दहावीच्या मंडळ परीक्षेत ९९ टक्क्यांहून अधिक आणि बारावीच्या मंडळ परीक्षेत ९७ टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा मंचावर गौरव करण्यात आला. संस्थेच्या तर्कशक्ती व अभिक्षमता चाचणीवर आधारित 'व्हिझकिड २०२५' स्पर्धेतील विजेत्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सादर केलेले सांस्कृतिक सादरीकरण उपस्थितांची दाद मिळवून गेले. संस्थेतून पुढील शैक्षणिक प्रवासासाठी बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशामागील शिक्षक, पालक आणि संस्थेचे योगदान अधोरेखित केले. त्यांनी कनिष्ठ विद्यार्थ्यांना अभ्यास, वेळेचे नियोजन आणि स्पर्धा परीक्षांची तयारी याबाबत मार्गदर्शनही केले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी संस्थेचे संचालक वैभव बाकलीवाल यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांचे यश हे त्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रम, पालकांचे सहकार्य आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाचे फलित असल्याचे सांगत त्यांनी उपस्थितांचे आभार मानले. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा आणि परिश्रमांचा गौरव करणारा हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

## 'दगडूशेठ' गणपती मंदिरात अधिक मासा निमित्त 'शुक्ल यजुर्वेद घन पारायण'

पुणे (दै. संध्या)

गणेश नामावली हवन, गणेश पुराण हवन यांसह सर्व मराठी महिन्यातील चतुर्थीव्रत कथा आणि धुंडीविनायक मास म्हणजेच अधिक मास कथा हवन 'दगडूशेठ' गणपती मंदिरात करण्यात आले. अधिक मास अर्थात धुंडीविनायक मासाच्या निमित्ताने मंदिरात 'शुक्ल यजुर्वेद घन पारायण' संपन्न झाले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ तर्फे आयोजित 'शुक्ल यजुर्वेद घन पारायण' अंतर्गत विविध धार्मिक विधी मंदिरात पार पडले. वेदमूर्ती मिलिंद राहूरकर गुरुजी यांच्या पौरोहित्याखाली दररोज सकाळी ९ ते दुपारी १ आणि दुपारी २ ते सायं. ७ दरम्यान मंदिरात पारायण व हवन करण्यात आले. गाणपत्य संप्रदायामध्ये ज्योतिष शास्त्राशी संबंधित भगवान गणेशांचा अवतार म्हणजे श्री ढुंढिराज अवतार. महाराजा दिवोदास नामक राजाच्या उद्धारासाठी झालेला आणि भगवान श्री शंकरांच्या द्वारे पूजन संपन्न झालेला हा दिव्य अवतार. आजही काशी क्षेत्रामध्ये भगवान श्री विश्वनाथ यांच्या मंदिरासमोर त्यांनी पूजन केलेले भगवान ढुंढिराज विद्यमान आहेत. विश्वनाथाच्या दर्शनाच्या आरंभी त्यांच्या दर्शनाची, वंदनाची परंपरा आहे. त्यांच्या उपासनेचे विशेष महत्व असल्याने या महिन्याला गाणपत्य संप्रदायात ढुंढिराज मास म्हणतात.

# ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कटिबद्ध

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

पुणे (दै. संध्या)



स्पर्धा, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात ग्रामीण भागातील विद्यार्थी कुठेही मागे राहू नयेत, यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार, आधुनिक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले.

नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या प्रारंभी मावळ तालुक्यातील पीएम श्री आदर्श केंद्र जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कान्हे येथे आयोजित 'शाळा प्रवेशोत्सव २०२६-२७' कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

यावेळी आमदार सुनील शेळके, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा परिषद सदस्य दिपाली हुलावळे, सुनीता येवले, शिक्षण विभागाचे उपसंचालक गणपतराव मोरे, शिक्षणाधिकारी भाऊसाहेब कारेकर, माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड, गणेश ढोरे, विठ्ठल शिंदे, गणेश खांडगे, साहेबराव कारके यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे तसेच प्रत्येक शाळेत आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करणे ही शासनाची नैतिक जबाबदारी आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात ग्रामीण विद्यार्थ्यांनाही शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणे समान संधी मिळणे आवश्यक आहे. यासाठी डिजिटल क्लासरूम, आधुनिक शैक्षणिक साधने आणि गुणवत्तापूर्ण पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी अभ्यासाबरोबरच क्रीडा, कला आणि कौशल्यविकासालाही प्रोत्साहन दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले. आमदार सुनील शेळके यांनी मावळ तालुक्यात शिक्षण क्षेत्रात सुरू असलेल्या विविध विकासकामांचा आढावा घेतला. जिल्हा परिषद शाळांमध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध करून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत विज्ञान, तंत्रज्ञान, क्रीडा आणि संशोधन क्षेत्रातही प्रगती साधून मोठी स्वप्ने पूर्ण करावीत, असे आवाहन त्यांनी केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. जिल्हा परिषद शाळांचे रूपांतर आधुनिक, डिजिटल आणि विद्यार्थी-केंद्रित शिक्षण संस्थांमध्ये करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षक, पालक आणि प्रशासन यांच्यातील समन्वय महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरली ती याच शाळेतील गुणवंत विद्यार्थिनी कु. रुद्रा गणेश राजगुरे. चाचणी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून 'नासा'सारख्या जागतिक दर्जाच्या संस्थेला भेट देण्याची संधी मिळविल्याबद्दल उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते तिचा विशेष सत्कार करण्यात आला. तिच्या यशाबद्दल अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच जिल्ह्यातील ३०३ केंद्रप्रमुखांना देण्यात येणाऱ्या टॅबपैकी प्रातिनिधिक स्वरूपात चार केंद्रप्रमुखांना मान्यवरांच्या हस्ते टॅब प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शाळेत प्रथमच प्रवेश घेणाऱ्या चिमुकल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून, फुलांचा वर्षाव करत आणि गुलाबजाम भरवत उत्साहात स्वागत केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत त्यांच्या शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षणाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण करणे, शाळेविषयी आपुलकी वाढविणे आणि आनंददायी वातावरणात नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात करणे हा शाळा प्रवेशोत्सवाचा उद्देश असून उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त तळजाई टेकडीवर वृक्षारोपण व स्वच्छता अभियान

■ पर्यावरण संवर्धनाचा संदेश

पुणे (दैनिक संध्या) : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून श्रीमद राजचंद्र लव्ह अँड केअर, पुणे सेंटरच्या वतीने तळजाई टेकडी येथे वृक्षारोपण व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छतेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे उद्घाटन पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका सौ. स्मिता वस्ते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी पर्यावरण संरक्षणासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली. अशा सामाजिक उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले. या अभियानात श्रीमद राजचंद्र लव्ह अँड केअर, पुणे सेंटरचे सदस्य भरत मेहता, जिग्नेश फुरिया, भावेश शाह यांच्यासह अनेक सेवकांनी सक्रिय सहभाग घेतला. उपस्थितांनी मोठ्या उत्साहाने विविध प्रकारच्या रोपांचे वृक्षारोपण केले. तसेच तळजाई टेकडी परिसरातील रस्त्यांच्या कडेला स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश दिला. या उपक्रमातून पर्यावरण संरक्षण, स्वच्छता आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व अधोरेखित झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आणि सेवाकार्यातील प्रेरणेसाठी सहभागी सदस्यांनी पूज्य गुरुदेवश्री राकेशजी यांचे मार्गदर्शन, प्रेरणा व आशीर्वाद याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पर्यावरण संवर्धनासाठी समाजातील सर्वांनी एकत्रितपणे पुढाकार घ्यावा, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## फ्रेडरिक कॉन्स्टंट तर्फे आयकॉनिक 'क्लासिक वर्ल्डटायमर मॅन्युफॅक्चर' सह फादर्स डे साजरा



पुणे (दैनिक संध्या) : या फादर्स डे निमित्त, फ्रेडरिक कॉन्स्टंट आपल्या नव्याने लाँच केलेल्या क्लासिक वर्ल्डटायमर मॅन्युफॅक्चर घड्याळाच्या माध्यमातून कारागिरी, अचूकता आणि परंपरेच्या मूल्यांवर विशेष प्रकाश टाकत आहे. २०१२ मधील लाँचिंगपासून हे या मेझॉनच्या प्रमुख मॉडेल्सपैकी एक राहिले आहे. या टाइमपीसमध्ये (घड्याळात) आता नवीन मॅन्युफॅक्चर एफसी -719 मुव्हमेंट, वाढीव ७२ तासांचा पॉवर रिझर्व्ह, आकर्षक ४० मिमी केस आणि तारीख नसलेले सुटसुटीत डायल समाविष्ट करण्यात आले आहे. फ्रेडरिक कॉन्स्टंटच्या स्वतःच्या कार्यशाळेत (वर्कशॉप) विकसित, असेंबल आणि रेग्युलेट करण्यात आलेली एफसी -719 ही मुव्हमेंट, १९८८ नंतरची मेझॉनची ३५ वी मॅन्युफॅक्चर मुव्हमेंट ठरली आहे. हे अद्ययावत क्लासिक वर्ल्डटायमर मॅन्युफॅक्चर मेकॅनिकल इनोव्हेशन आणि आधुनिक डिझाइनचा मेळ घालत एकाच वेळी सर्व २४ टाइम झोन दर्शवण्याचे आपले वैशिष्ट्य पुढे चालू ठेवत आहे. आज सर्व कुटुंबे वडिलांचा सन्मान करत त्यांच्या अखंड प्रभावाचा उत्सव साजरा करत असताना, हे क्लासिक वर्ल्डटायमर मॅन्युफॅक्चर पिढ्यानपिढ्या चालत आलेली शाश्वत मूल्ये, सूक्ष्म कारागिरी आणि उत्कृष्टतेचा ध्यास यांना दिलेली एक अनोखी मानवंदना आहे.

## विचारपूर्वक निवडलेल्या फादर्स डे भेटवस्तू – नेहमीच्या पर्यायांपलीकडे



पुणे (दैनिक संध्या) : वडील आपल्या आयुष्यात दररोज एका खास पद्धतीने साथ देत असतात. मदतीसाठी सर्वप्रथम पुढे येणारे, स्वतःसाठी काहीही न मागणारे आणि कोणत्याही परिस्थितीत ज्यांच्यावर आपण विश्वास ठेवू शकतो असे ते असतात. त्यांची काळजी घेण्याची पद्धत शांत, सातत्यपूर्ण आणि कायमसोबत असणारी असते. या फादर्स डे निमित्त त्यांना अशा भेटवस्तू द्या ज्या विचारपूर्वक निवडलेल्या, उपयुक्त आणि वैयक्तिक वाटतील. भव्य भेटवस्तू नव्हे, तर रोजच्या आयुष्यात थोडा अधिक आनंद आणि सोय आणणारे छोटेसे बदल. कारण फादर्स डे हा फक्त भेटवस्तू देण्याचा दिवस नाही. तर त्यांनी आपल्या आयुष्यासाठी केलेल्या त्या असंख्य छोट्या गोष्टींसाठी त्यांचे आभार मानण्याची एक संधी आहे, ज्या ते अनेकदा कोणत्याही अपेक्षेशिवाय करत असतात. आणि Nykaa च्या खास निवडलेल्या कलेक्शनमुळे त्यांच्यासाठी परफेक्ट भेटवस्तू शोधणे आता अधिक सोपे झाले आहे. त्यांच्या ग्रूमिंग रुटीनमध्ये Anua Heartleaf Quercetinol Pore Deep Cleansing Foam आणि Nykaa Wanderlust Mediterranean Sea Salt Fresh Perfume Body Wash सारख्या उत्पादनांसह एक छोटासा अपग्रेड असो, Prada L'Homme Eau de Toilette किंवा RALPH LAUREN Cologne Intense Eau De Toilette For Him यांसारख्या सुगंधांमधून त्यांना त्यांचा नवा सिग्नेचर फ्रॅग्रन्स शोधण्यास मदत करणे असो, किंवा La Roche-Posay Anthelios UVMUNE400 Invisible Fluid SPF50+ आणि Aestura Atobarrier365 Cream यांच्या मदतीने त्यांची स्किनकेअर रुटीन अधिक सोपी करणे असो — या सर्व विचारपूर्वक निवडलेल्या भेटी त्यांच्या दैनंदिन आयुष्याचा सहज भाग बनण्यासाठी डिझाइन करण्यात आल्या आहेत. कारण सर्वोत्तम भेटवस्तू अनेकदा सर्वात साध्या असतात. त्या ज्या एखाद्याला हे जाणवून देतात की त्यांची कदर केली जाते. या फादर्स डे निमित्त Nykaa कडून विचारपूर्वक निवडलेल्या भेटवस्तूंनी त्यांचा सन्मान करा. हे कलेक्शन Nykaa ॲपवर, www.nykaa.com वर किंवा तुमच्या जवळच्या Nykaa स्टोअरमध्ये उपलब्ध आहे.

## चित्रपट महामंडळाच्या अध्यक्षपदी मेघराज राजेभोसले

पुणे (दैनिक संध्या) : अखिल भारतीय चित्रपट महामंडळाच्या अध्यक्षपदी मेघराज राजेभोसले यांची सोमवारी अपेक्षेप्रमाणे बिनविरोध निवड करण्यात आली. कोल्हापूरला झालेल्या महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत अध्यक्षपदासह २०२६ ते २०३१ या कार्यकाळासाठी नूतन कार्यकारी मंडळाचीही निवड करण्यात आली. महामंडळाच्या नुकत्याच झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीत राजेभोसले यांच्या नेतृत्वाखालील 'समर्थ पॅनेल'च्या उमेदवारांनी सर्व जागांवर विजय मिळवला होता. तीन बिनविरोध निवड झालेल्या पदांमध्येही दोन सदस्य त्यांच्याच पॅनेलचे बहुमत होते. १७ पैकी १६ जागांवर वर्चस्व असल्याने कार्यकारी मंडळाची निवड ही केवळ औपचारिकता होती. ही निवडीची बैठक निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी खडके यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी उपाध्यक्षपदी धनाजी यमकर (कोल्हापूर) आणि आनंद शिंदे (मुंबई) यांची निवड करण्यात आली. तसेच, प्रमुख कार्यवाहपदी सुशांत शेलार, कोषाध्यक्षपदी सुनील महाजन, सहकार्यवाहपदी दीपक कदम व प्रवीण पाटील आणि सहकोषाध्यक्षपदी शरद चव्हाण यांची निवड करण्यात आली. बैठकीला राज काझी, अजित शिरोळे, सुभाष नकाशे, प्रवीण पाटील, चैत्राली डोंगरे, विजय खोचीकर ,रवींद्र गावडे, गणेश गारगोटे, विकास तोरणे आदी संचालक उपस्थित होते. या वेळी नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

# त्वचेला आवश्यक असलेले ६ पोषक घटक

नवी दिल्ली (दै. संध्या) :

कोणत्याही सौंदर्य विभागातून फिरताना तुम्हाला इन्स्टंट ग्लोचे आश्वासन देणारे सिरम्स, फेस मास्क्स आणि ओव्हरनाईट क्रीम्स यांची भरमार दिसते. मात्र, कोणताही क्लिनिकल न्यूट्रिशनिस्ट सांगेल की त्वचा ही केवळ शरीरात आत काय घडते याचे प्रतिबिंब असते. खराब आहाराला केवळ स्किनकेअरने संतुलित करता येत नाही. जेव्हा शरीराला आवश्यक सूक्ष्म पोषक घटकांची कमतरता भासते, तेव्हा त्याचे परिणाम थेट चेहऱ्यावर दिसतात—निस्तेजपणा, कोरडेपणा किंवा लवकर येणाऱ्या सूक्ष्म सुरकुत्यांच्या स्वरूपात.

रात्री चेहरा धुतल्यावरही नाहीशी न होणारी, नैसर्गिक आणि चिरकाल टिकणारी त्वचा-कांती मिळवण्यात तुम्हाला मदत करण्यासाठी, 'मॅक्स हेल्थकेअर'च्या आहारशास्त्र विभागाच्या प्रादेशिक प्रमुख रितिका समाद्दार अशा सहा मूलभूत पोषक घटकांची माहिती देत आहेत, जे तुमच्या त्वचेला अगदी पेशींच्या पातळीपासून पोषण देतात:

1. व्हिटॅमिन ई: व्हिटॅमिन ई हे एक फॅट-सोल्युबल अँटीऑक्सिडंट आहे. हे प्रदूषण आणि UV (अल्ट्राव्हायोलेट)



एक्सपोजरमुळे होणाऱ्या ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून त्वचेच्या पेशींचे संरक्षण करते. हे पेशी पातळीवर ओलावा टिकवून ठेवण्याचे काम करते, ज्यामुळे त्वचा भरदार (plump) आणि लवचिक (resilient) राहते. कॅलिफोर्निया बदाम हे आहारातील व्हिटॅमिन ईचे सर्वात समृद्ध स्रोत आहेत, आणि काही बदाम रोजच्या गरजेचा मोठा भाग पूर्ण करतात, तेही शरीर चांगल्या प्रकारे शोषू शकणाऱ्या स्वरूपात. हे सवयीत आणण्याचा एक सोपा मार्ग म्हणजे त्यांना तुमच्या सकाळच्या स्मूदीमध्ये टाकणे किंवा घराबाहेर जाण्यापूर्वी तुमच्या सिरीयलवर भुरभुरवणे.

2. व्हिटॅमिन सी: कोलेजन हेच त्वचा घट्ट आणि लवचिक ठेवते, आणि व्हिटॅमिन सी शरीराला ते तयार करण्यासाठी आवश्यक असते. हे वेळोवेळी हायपरपिग्मेंटेशन कमी करण्यासही मदत करते, ज्यामुळे निस्तेज त्वचा हळूहळू उजळते. आवळा, सिट्रस फळे आणि शिमला मिरची हे दररोज ही गरज पूर्ण करण्याचे सर्वात विश्वासार्ह स्रोत आहेत.

3. ओमेगा-३ फॅटी ॲसिड्स: हे हेल्दी फॅट्स त्वचेचा लिपिड बॅरियर तयार करतात, जो ओलावा आत ठेवतो आणि त्रासदायक घटक बाहेर ठेवतो. ओमेगा-३ कमी असलेला आहार अनेकदा कोरडी, सोलणारी किंवा सूज आलेली त्वचा म्हणून दिसून येतो. फ्लॅक्ससीड्स, बदाम आणि चिया सीड्स हे वनस्पती-आधारित व्यावहारिक स्रोत आहेत, जे दैनंदिन जेवणात सहज समाविष्ट करता येतात.

4. झिंक: झिंक त्वचेतील तेलाचे (oil) उत्पादन नियंत्रित करते आणि त्वचेच्या खोल थरांमध्ये पेशींची दुरुस्ती करण्यास मदत करते, त्यामुळे ते अनेकदा स्वच्छ त्वचा आणि कमी पिंपल्सशी संबंधित मानले जाते. हरभरा आणि संपूर्ण धान्ये हे या सूक्ष्म खनिजाचे चांगले दैनंदिन स्रोत आहेत.

5. बीटा-कॅरोटीन: हे व्हिटॅमिन एचे पूर्वरूप (precursor) आहे. बीटा-कॅरोटीन त्वचेतील पेशींच्या नूतनीकरणाला (skin cell turnover) चालना देते, ज्यामुळे मृत पेशी साचल्यामुळे येणारा निस्तेजपणा टाळता येतो. हे त्वचेच्या रंगाला सौम्य आणि निरोगी उबदारपणा (warmth) देखील देते. गाजर, रताळे आणि पालक हे याचे सर्वात सहज उपलब्ध आणि परवडणारे स्रोत आहेत, जे नियमितपणे आहारात समाविष्ट करता येतात.

6. बायोटिन: बायोटिन बहुतेक वेळा केसांच्या आरोग्यासोबत जोडले जाते, पण त्याचे फायदे त्वचेसाठीही तितकेच महत्त्वाचे आहेत. हे त्वचेतील फॅटी ॲसिड मेटाबॉलिझम टिकवून ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावते, ज्यामुळे त्वचेचा पृष्ठभाग गुळगुळीत, ओलसर आणि कमी त्रासदायक (irritation) राहतो. अंडी, कॅलिफोर्निया बदामांसारखे सुका मेवा आणि केळी हे या बी-व्हिटॅमिनचे सर्वात सामान्य आणि सहज उपलब्ध आहार स्रोत आहेत.

रितिका समद्दार यांच्या मते, दिलासादायक बाब अशी आहे की यासाठी आहारात कोणताही मोठा बदल करण्याची आवश्यकता नाही. हे सहा पोषक घटक संतुलित आणि बहुतांश प्रमाणात वनस्पती-आधारित आहारातून सहज उपलब्ध होतात, जो भारतीय स्वयंपाकघरांमध्ये आधीपासूनच मोठ्या प्रमाणात आढळतो.

## सोलरस्क्वेअरने खराडी येथे नवीन सोलर सेंटर सुरू केले

पुणे (दै. संध्या) :

भारतातील अग्रगण्य रूफटॉप सोलर कंपनी सोलरस्क्वेअरने पुण्यात आपले दुसरे सोलर सेंटर सुरू केले आहे. खराडी येथील न्याती प्लाझामध्ये सुरू करण्यात आलेल्या या केंद्राचा उद्देश लोकांना सौर ऊर्जेबाबत योग्य माहिती देणे आणि त्यांना सोलर स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे. या माध्यमातून पूर्व पुण्यातील कुटुंबांना सौर ऊर्जेची जवळून माहिती मिळेल आणि त्यांच्या गरजेनुसार मार्गदर्शन मिळू शकेल. पुण्यात रूफटॉप सोलरची मागणी सातत्याने वाढत आहे, मात्र जागरूकता आणि विश्वासाचा अभाव अजूनही अनेक कुटुंबांसाठी मोठे आव्हान आहे. हे लक्षात घेऊन सोलरस्क्वेअरने हे केंद्र अशा प्रकारे विकसित केले आहे की, येथे लोकांना सोलर सिस्टम प्रत्यक्ष पाहता येईल, त्याची कार्यपद्धती समजून घेता येईल आणि आपल्या घरासाठी योग्य पर्याय निवडता येईल. या केंद्रामध्ये सोलरस्क्वेअरचे विशेष विंडप्रो माउंट™ देखील प्रदर्शित करण्यात आले आहे, जे जोरदार वारे आणि प्रतिकूल हवामानाचा सामना करण्यासाठी तयार करण्यात आले आहे. येथे भेट देणारे नागरिक



विशेष डेमोद्वारे पाहू शकतील की ही तंत्रज्ञान साधारण संरचनांच्या तुलनेत कशाप्रकारे अधिक चांगली कामगिरी करते. याशिवाय, सोलर सिस्टमची गुणवत्ता, देखभाल आणि दीर्घकालीन बचतीबाबतही माहिती दिली जाईल. केंद्रात डिजिटल स्क्रीनच्या मदतीने लोकांना त्यांच्या घराच्या छतावर सोलर पॅनेल बसवल्यानंतर ते कसे दिसेल हेही पाहता येईल. त्यामुळे कुटुंबांसाठी सोलर स्वीकारण्याचा निर्णय अधिक सोपा होईल. या प्रसंगी श्रेया मिश्रा, सह-संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), सोलरस्क्वेअर यांनी सांगितले, "पुण्यात सोलर स्वीकारण्याची रुची सातत्याने वाढत आहे. या नव्या केंद्राच्या माध्यमातून आम्ही लोकांपर्यंत अधिक जवळ पोहोचू इच्छितो, जेणेकरून ते सौर ऊर्जेला अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतील आणि विश्वासाने ती स्वीकारू शकतील.

## आकांक्षा फाऊंडेशनसह अन्य संस्थांना मनपा शाळांचे दरवाजे खुले

पुणे (दै. संध्या) :

पुणे महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याच्या नावाखाली आता खासगी संस्थांना शाळा चालविण्यास देण्याचा धडाका महापालिका प्रशासनाने लावला आहे. 'आकांक्षा फाऊंडेशन'ला पाच शाळा दिल्यानंतर आता अन्य संस्थांनीही स्वारस्य दाखविल्यास त्यांना शाळा चालविण्यास दिल्या जातील, अशी घोषणा सभागृहनेते गणेश बिडकर यांनी आज केली. पुणे महापालिकेच्या पाच शाळा आकांक्षा फाऊंडेशनला सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर चालविण्यासाठी देण्यात आल्या आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून या शाळांचा खर्च संस्था स्वतः करत होती. मात्र, सीएसआर निधीत घट



झाल्याचे कारण पुढे करत संस्थेने महापालिकेकडे प्रति विद्यार्थी २७ हजार रुपयांची मागणी केली होती. अखेर प्रति विद्यार्थी २५ हजार रुपये देण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. पुढील नऊ वर्षांसाठी ४ हजार ५०० विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी महापालिका १०१ कोटी रुपये मोजणार आहे. या प्रस्तावामुळे महापालिका वर्तुळात तीव्र पडसाद उमटले असून, त्यास विरोध केला जात आहे.

## वाचन संस्कृती टिकवण्यासाठी मोफत वृत्तपत्र उपक्रम कौतुकास्पद

### श्री. गणेश बिरादार अप्पर पोलीस अधीक्षक बारामती विभाग यांचे गौरवोद्गार

माळेगाव (दै. संध्या) :

मुलांनी मोबाईल पासून दुर राहण्यासाठी व वाचन संस्कृती टिकवण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांना दैनिक पुण्यनगरीचा अंक दररोज देण्याचा सामाजिक कार्यकर्ते संदीप आढाव यांचा उपक्रम कौतुकास्पद आहे असे गौरवोद्गार अपर पोलीस अधीक्षक बारामती विभाग गणेश बिरादार यांनी काढले. माळेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ( मुलांची) येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या सुरवातीला नवगतांचे स्वागत प्रसंगी ते बोलत होते.यावेळी सहायक पोलिस निरीक्षक कुलदीप संकपाळ, बारामती तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष योगेश भोसले,संदिप आढाव,अनिल मदने,कृष्णमुर्ती



### अपर अधिक्षक रमले शालेय जीवनात

मुळ शिक्षकीपेशा असलेले व स्पर्धा परीक्षा देऊन अपर पोलीस अधीक्षक झालेले गणेश बिरादार यांनी ते शिक्षक असताना भाषणात अनेक आठवणींना उजाळा दिला.

जगताप,सुभाष साठे,सोपान घाडगे,निलेश गंगावणे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना गणेश बिरादार म्हणाले की,विद्यार्थ्यांनो खुप शिका, मोठे अधिकारी बना. चांगले नागरिक बनुन देशसेवा करा. यावेळी नवगतांना पाठ्यपुस्तके दप्तर व खाऊ वाटप करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापिका ज्योत्स्ना वाघमोडे,सहशिक्षिका वैशाली जाधव,पंचगंगा पानसांडे,रमेश कवितके यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## जेसीबी इंडियाने ६,००,००० व्या मशीनचा टप्पा गाठला

पुणे (दै. संध्या) :

जेसीबी इंडियाने आपल्या 6,00,000 व्या मशीनचे उत्पादन आणि विक्री करून एक मोठा मैलाचा दगड गाठला आहे. हा टप्पा म्हणजे देशाच्या पायाभूत सुविधांच्या विकासात योगदान देणारे ग्राहक, डीलर्स, पुरवठादार आणि स्थानिक समुदायांसोबत चार दशकांहून अधिक काळाच्या भागीदारीचे प्रतीक आहे. ही 6,00,000 वी मशीन एक बॅकहो लोडर आहे, जी पायाभूत सुविधा, ग्रामीण आणि कृषी क्षेत्रातील वैविध्यतता व कार्यक्षमतेसाठी ओळखली जाणारी आणि देशात सर्वाधिक वापरली जाणारी बांधकाम मशीन आहे.

गेल्या काही वर्षांत, कंपनीने आपल्या उत्पादनाचा विस्तार केला आहे, प्रबळ पुरवठादार परिसंस्था तयार केली आहे आणि स्थानिक परिस्थितीला अनुकूल अशी उत्पादने विकसित केली आहेत. सहा अत्याधुनिक उत्पादन केंद्रांसह भारत जेसीबीसाठी प्रमुख जागतिक उत्पादन केंद्र बनला आहे. भारतामधून 135 हून अधिक देशांमध्ये मशीन्सची निर्यात केली



जाते. याप्रसंगी मत व्यक्त करत जेसीबी इंडियाचे सीईओ आणि मॅनेजिंग डायरेक्टर श्री. दीपक शेट्टी म्हणाले, "हा मैलाचा दगड केवळ एका आकड्यापुरता मर्यादित नाही, तर अनेक दशकांपासून ग्राहकांनी जेसीबीवर दाखवलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे. या यशाचे प्रतिनिधित्व करणारा बॅकहो लोडर भारतातील पायाभूत सुविधा आणि विकासाच्या प्रवासाशी जवळून जोडला गेला आहे. आमच्या प्रवासाचे अविभाज्य घटक राहिलेले ग्राहक, डीलर्स, पुरवठादार व भागधारक यांच्या निरंतर विश्वास आणि पाठिंब्यामुळे हा टप्पा गाठणे शक्य झाले आहे. आमचे अनेक भागीदार आता दुसऱ्या आणि तिसऱ्या पिढीचे प्रतिनिधित्व करत आहेत, ज्यामधून समान मूल्ये आणि परस्परांच्या वाढीवर आधारलेले आमचे दृढ, दीर्घकालीन संबंध दिसून येतात."

जेसीबीचे चेअरमन लॉर्ड बॅमफोर्ड म्हणाले, "जेसीबीने गेल्या वर्षी आपला 80वा वर्धापन दिन साजरा केला आणि या ऐंशी वर्षांपैकी जवळपास पन्नास वर्षे आम्ही भारतातील ग्राहकांना जेसीबी मशीन्सची विक्री करत आहोत. मला अत्यंत आनंद होत आहे की, आमच्या वर्धापन दिनाच्या मैलाच्या दगडापाठोपाठ लगेच भारतात 6,00,000 व्या मशीनच्या विक्रीचा ऐतिहासिक टप्पा गाठला गेला आहे. हे अगदी समर्पक आहे की, ही 6,00,000 वी मशीन जेसीबी बॅकहो लोडर आहे, कारण याच मशीनने अलीकडच्या दशकांमध्ये भारतातीलपायाभूत सुविधांच्या उभारणीत मोलाचे योगदान दिले आहे. हे जेसीबीचे सर्वात वैविध्यपूर्ण उत्पादन आहे आणि भारताचे भविष्य घडवण्यासाठी आमचे ग्राहक पुढील अनेक वर्षे या बॅकहो लोडरचा वापर करत राहतील, जी खरोखर एक उल्लेखनीय गोष्ट आहे."


## पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११०१८

उद्यान/वृक्षसंवर्धन विभाग

ई निविदा नोटीस क्रमांक –वृक्ष ०१/२०२६–२०२७

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वृक्षसंवर्धन विभागाकडील पिंपरी चिंचवड शहरामधील कचरा श्रेडींग करणेकामी ट्रॅक्टर भाडेतत्वावर घेणे साठीचे ई टेडर अंतर्गत नोदणीकृत ठेकेदाराकडुन (GSTवगळुन) निविदा मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | उद्यानाचे नाव | निविदा र,रु. | बयाणा र,रु. | अनामत र.रु. | कामाची मुदत | निविदा फार्म फी परत न मिळणारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनपाचे सर्व क्षेत्रीय कार्यालयातील उद्यान /वृक्षसंवर्धन विभागामधिल फांद्या/कचरा श्रेडींग करणे कामी ट्रॅक्टर(ट्रॉलीसह) (५५ HP) भाडेतत्वावर ०१ वर्षे कालावधीसाठी पुरविणे व देखभाल करणे | ८५,७०,३४०/- | ८५,७०३/- | ४,२८,५१७/- | ०१ वर्ष | ३,१४७/- |

निविदेचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| ई- निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक : १६/०६/२०२६ ते २३/०६/२०२६ |
| निविदा स्विकृती अंतिम दिनांक व वेळ | दिनांक : २३/०६/२०२६ दुपारी ३.०० पर्यंत |
| निविदा उघडणेचा दिनांक | दिनांक : २४/०६/२०२६ सकाळी ११.०० वा. |

कोणतेही कारण न देता निविदा पुर्णता किंवा अंशता मंजुर अथवा नामंजुर करणेचा अधिकार मा. अति.आयुक्त यांनी स्वता कडे राखून ठेवला आहे. निविदा संचाची विक्री https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई निविदा सुचनेत नमुद केलेल्या तारखेनुसार सुरू राहिल.सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

१.सदरची निविदा https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सदरची ई निविदाप्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माणझाल्यास NIC यांचेकडील ईमेलsupport-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002, 0120-4001005, 0120-6277787 या दुरध्वनीवरसंपर्क साधावा.

सही/-
अति. आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

जाहिरात क्रमांक - 2026-27/62
क्रमांक - उदयान/०४/कावि/२१६/२०२६
दिनांक – १५/०६/२०२६



## ग्रामपंचायत चिव्हेवाडी, ता. पुरंदर जि. पुणे

B-1 टेडर नोटीस क्र.१ सन २०२६/२७

ग्रामपंचायत चिव्हेवाडी, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत चिव्हेवाडी ता. पुरंदर जि. पुणे यांच्याकडुन दिनांक १६/०६/२०२६ ते दिनांक २३/०६/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व दिनांक १६/०६/२०२६ ते दिनांक २३/०६/२०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यत पोस्टाने समक्ष ग्रामपंचायत मद्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी /ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा विक्री करण्याचा कालावधी | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | चिव्हेवाडी येथे स्वच्छतागृह बांधणे. | २९९७८८/- | दिनांक १६/०६/२०२६ ते दिनांक २३/०६/२०२६ | २३६/- | २९९८/- |

निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे : १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत चिव्हेवाडी PDCC बँक शाखा सासवड खाते क्र. ००६००२५००००००६६ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत चिव्हेवाडी ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा सासवड खाते क्र. ००६००२५००००००६६ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश /डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत चिव्हेवाडी यांनी राखुन ठेवला आहे.

प्रशासक ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत चिव्हेवाडी, ता. पुरंदर जि. पुणे



## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष

ई-निविदा जाहिरात - फेर निविदा जाहिरात

विक्री कालावधी दिनांक : दि. १६/०६/२०२६ ते दि. २३/०६/२०२६ २:३० पर्यंत

स्विकृती दिनांक : दि. १६/०६/२०२६ ते दि. २३/०६/२०२६ २:३० पर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक :- २४/०६/२०२६ ३.०० दुपारी

| अ. क्र. | निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | PMC/ ELECTRICAL/ 2026/10 | विद्युत विभाग | पुणे महानगरपालिकेचे मुंढवा मैलापाणी शुद्धीकरण केंद्रामधील सिवेज पंपिंग स्टेशन व SBR टेक्रोलॉजी करिता नव्याने PLC व स्काडा मिटीम व DO ऍनालायझर पुरविणे, बसविणे व चालू करून देणे. (पुणे मनपा अथवा शासकीय संस्थांचें रेजिस्ट्रेशन अट शिथिल) | 6079.00 | 5615854.00 | 56159.00 | ६ महिने | श्री. वैभव घुले 7447472413 |
| २ | PMC/ ELECTRICAL/ 2026/11 | विद्युत विभाग | पुणे महानगरपालिकेचे खराडी मैलापाणी शुद्धीकरण केंद्रामधील सिवेज पंपिंग स्टेशन व SBR टेक्रोलॉजी करिता नव्याने PLC व स्काडा सिस्टीम व DO ऍनालायझर पुरविणे, बसविणे व चालू करून देणे. (पुणे मनपा अथवा शासकीय संस्थांचे रेजिस्ट्रेशन अट शिथिल) | 6079.00 | 5615854.00 | 56159.00 | ६ महिने | श्री. वैभव घुले 7447472413 |

निविदा संचाची विक्री www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सूचनेत नमूद केलेल्या तारखेनुसार सुरू राहील. सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे. www.mahatenders.gov.in

सदरची ई-निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल Support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002 या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
अधिक्षक अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/२१४ दि. १५/०६/२०२६

## थोडक्यात पण महत्वाचे...



### विद्यार्थ्यांचा सन्मान, यशाला मिळाली सुवर्णदाद

पिंपरी (दैनिक संध्या) : दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. मलबार गोल्ड अँण्ड डायमंड्स, पिंपरी शाखेतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक संघाचे विशेष सहकार्य लाभले. उद्योजक शंकरराव शेळके आणि प्रमुख पाहुणे नितीन जुन्नरकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्ष नंदिनी टाले, उपाध्यक्ष विठ्ठलराव कांबळे, संपदा नातू, काशिनाथ उंडे, स्नेहल रानडे, आशा जैन, किसन शिंदे, विनायक हेंद्रे आणि लक्ष्मीकांत कुलकर्णी उपस्थित होते. मलबार गोल्ड अँण्ड डायमंड्स, पिंपरी शाखेचे जय रामचंद्र मिसाळ, नेहा मलकेकर, विशाल माने आणि रोहित वाडमारे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. "गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा त्यांच्या कष्टांचा गौरव आहे. अशा उपक्रमांमुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळते. शिक्षण क्षेत्रातील गुणवत्ता वाढीसाठी आम्ही कायम प्रयत्नशील राहू," असे जय रामचंद्र मिसाळ यांनी सांगितले. या कार्यक्रमास विद्यार्थी, पालक आणि नागरिकांची चांगली उपस्थिती होती. सत्कारामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढला. पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

### कशी PCMC ने थट्टा आमची मांडली.. नाट्यगृहाच्या दुर्दशेवर कलाकारांची खंत

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवडमधील प्रसिद्ध रामकृष्ण मोरे नाट्यगृहाच्या दुर्दशेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. लोकप्रिय बालनाट्य 'अलबत्या गलबत्या'च्या कलाकारांनी नाट्यगृहातील विविध असुविधांबाबत थेट प्रेक्षकांसमोर नाराजी व्यक्त केली आहे. महाराष्ट्रातील अनेक नाट्यगृहांची दुरावस्था हा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून कायम असून, याचा फटका कलाकार आणि रसिक प्रेक्षकांना सहन करावा लागत आहे. याबाबत अनेक कलाकारांनी वेळोवेळी आवाज उठवला असला तरी संबंधित सांस्कृतिक विभाग आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून अपेक्षित उपाययोजना होत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे. 'अलबत्या गलबत्या' नाटकाच्या प्रयोगादरम्यान कलाकारांनी नाट्यगृहातील अपुऱ्या सुविधा, तांत्रिक अडचणी आणि देखभालीच्या अभावामुळे होणाऱ्या गैरसोयींचा उल्लेख केला. तसेच, या समस्यांबाबत प्रेक्षकांनीही आवाज उठवावा आणि प्रशासनापर्यंत हा प्रश्न पोहोचवावा, असे आवाहन त्यांनी केले. कलाकारांच्या या भूमिकेमुळे रामकृष्ण मोरे नाट्यगृहाच्या देखभाल व सुविधा सुधारण्याचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला असून, याकडे महापालिका प्रशासन आणि सांस्कृतिक विभागाने तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

### वेबसाईटद्वारे गुंतवणुकीच्या आमिषाने तरुणाची 21 लाख 48 हजारांची फसवणूक

पिंपरी (दैनिक संध्या) : ऑनलाइन गुंतवणुकीवर अल्पावधीत मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका तरुणाची तब्बल २१ लाख ४८ हजार ४९० रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी निगडी पोलिस ठाण्यात माहिती तंत्रज्ञान अधिनियम आणि फसवणुकीच्या कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरूण (वय २३) यांची त्यांच्या मित्रामार्फत आरोपींशी ओळख झाली होती. आरोपींनी "Botbro" नावाच्या वेबसाईटद्वारे गुंतवणूक केल्यास दरमहा ७ ते ८ टक्के परतावा मिळेल, असे आमिष दाखवले. त्यानुसार फिर्यादी व त्यांच्या साथीदारांकडून वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये वेळोवेळी एकूण २१ लाख ४८ हजार ४९० रुपये गुंतवण्यात आले. सुरुवातीला आकर्षक परताव्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, गुंतवलेली रक्कम परत काढण्याचा प्रयत्न केल्यानंतर ती मिळाली नाही. याबाबत आरोपींकडे वारंवार पाठपुरावा करूनही त्यांनी कोणतीही रक्कम परत न देता आर्थिक फसवणूक केल्याचे फिर्यादीच्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी सुयश सुनील शहापूरे (वय २४, रा. श्री साई गणेश पार्क बिजलीनगर चिंचवड), सुजीत सुनील काळे (वय २६, रा. शिवशंभो लेन, सिंबोसिस कॉलेज रोड, मुकाई चौक, किवळे) आणि खुशी तिवारी (वय २५, रा. तळेगाव दाभाडे) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच Botbro वेबसाईटचा धारक अद्याप फरार असून त्याचाही तपास सुरू आहे. निगडी पोलीस निरीक्षक घोडे पाटील या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

### स्वरांजलीतर्फे आज आरोग्य तपासणी आणि लाईव्ह ऑर्केस्ट्रा




पिंपरी (दैनिक संध्या) : दृष्टीदान पंधरवडानिमित्त 'स्वरांजली म्युझिकल परिवारा' तर्फे ऑर्केस्ट्रा आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हा भव्य कार्यक्रम मंगळवार, १६ जून २०२६ रोजी तपासणी १२ ते ६ या वेळेत तर स्व आशा भोसले यांना आदरांजली म्हणून लाईव्ह ऑर्केस्ट्रा संध्या ५ ते रात्री ८: या वेळेत होईल.हा कार्यक्रम ग. दि. माडगुळकर नाट्यगृह आकुर्डी येथे संपन्न होणार असल्याची माहिती आयोजक डॉ अंजली कुलकर्णी यांनी दिली. यावेळी सुमारे ₹२८,००० किमतीची १२ ते ६ या वेळेत मोफत आरोग्य तपासणी केली जाईल.

# तळवडे स्वागत कमानीचे काम चार वर्षांपासून रखडले

**वाहतूक कोंडीने नागरिक त्रस्त : तीन वेळा मुदतवाढ, दररोज दंड तरीही केवळ ५० टक्के काम पूर्ण; आषाढी वारीपूर्वी लोखंडी अँगल हटविण्याचे काम सुरू**



मोशी (दै. संध्या)

तळवडे परिसराची ओळख सांगणाऱ्या कमानीचे काम मागील चार वर्षांपासून सुरू आहे. आतापार्यंत तीन वेळा मुदतवाढ देऊनही पन्नास टक्केच काम पूर्ण झाले आहे. रस्त्याच्या मधोमध हे काम सुरू असल्यामुळे आषाढी वारी, तुकाराम बीज या दरम्यान आतापार्यंत चार वेळा कमानीचा ढाचा काढण्यात आला आहे. तसेच मजुरांचे शॉर्टेज अन् ठेकेदाराच्या दुर्लक्षामुळे हे कामकाज रखडले आहे. रखडलेल्या कामामुळे रहदारीचा प्रश्न गंभीर बनला आहे. आषाढीवारी आधीच या कमानीसाठी उभे केलेले लोखंडी अँगल काढण्याचे काम सुरू आहे. ज्यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे. लवकरात-लवकर कमानीचे काम पूर्ण करावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे. देहू आणि आळंदी या प्रमुख तीर्थक्षेत्रांना जोडणारा हा मार्ग एमआयडीसी, आयटी पार्क, शाळा, महाविद्यालये आणि निवासी भागांमुळे कायम वर्दळीचा असतो. या मार्गावर महापालिकेकडून कमान उभारणीचे काम जून २०२२ मध्ये सुरू करण्यात आले. काम पूर्ण करण्याची मुदत जून २०२४ पर्यंत होती. मात्र, मुदत संपून दोन वर्षे उलटल्यानंतरही काम पूर्णत्वास गेले नाही. या प्रकल्पासाठी रस्त्याच्या मध्यभागी लोखंडी अँगल उभारण्यात आल्याने रस्ता अरुंद झाला आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी होत असून, अनेकदा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. तसेच राडारोड्यामुळे परिसरात धुळीचे प्रमाण वाढले असून, नागरिकांना गेल्या चार वर्षांपासून या समस्यांचा सामना करावा लागत आहे. काम वेळेत पूर्ण न केल्याबद्दल संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई सुरू असूनही प्रत्यक्षात कामाच्या गतीत फारशी सुधारणा झालेली नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. देहू आळंदी तीर्थक्षेत्रांना जोडणारा मार्ग तळवडे येथून जातो. महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून येणार्या वारकरी व भाविकांचे स्वागत करण्यासाठी महापालिका हद्द व देहू नगर परिषद सीमेवर भव्य स्वागत कमान उभारण्यात येत आहे. परंतु कासवगतीने सुरू असलेल्या कामामुळे व संबंधित ठेकेदाराच्या नियोजनशून्य कारभाराचा फटका या मार्गाने प्रवास करणारे वारकरी, भाविक व स्थानिक नागरिकांना मागील चार वर्षांपासून बसत आहे.

> प्रशासनाच्या कार्यकाळात कमानीच्या कामाकडे दुर्लक्ष झाले. संबंधित ठेकेदाराला टर्मिनेट करण्याचा विषय तत्कालीन आयुक्त यांच्यापुढे झाला होता. मात्र, प्रवेशद्वाराचे कामकाज लवकरात-लवकर पूर्णत्वास नेतो, असे आश्वासन ठेकेदाराने दिले. त्यानुसार कामकाज सुरू आहे. त्यांना प्रवेशद्वाराचा ढाचा आतापर्यंत चार वेळा काढावा लागला आहे. आता पालखीसोहळ्यामुळे काम थांबणार आहे. मात्र, पुढील चार ते पाच महिन्यांत कामकाज पूर्ण होण्याची शक्यता आहे.
>
> **- पंकज भालेकर, नगरसेवक**

> तळवडे येथे उभारण्यात येत असलेल्या कमानीचे काम दगडाचे आहे. यामुळे कामाला वेळ लागत आहे. दोन वेळा पालखीसोहळा, तुकाराम बीज यामुळे कमानीसाठी उभारलेला ढाचा काढावा लागला. त्यानंतर मॅनपॉवर शॉर्टेज, ठेकेदाराची चूक यामुळे काम संथगतीने झाले. आता पालखी सोहळ्यामुळे कमानीच्या कामासाठी उभे केलेले अँगल काढण्याचे काम सुरू आहे. ठेकेदाराला दररोज दोन हजार रुपये दंड आकारण्यात येत आहे. काम लवकर पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून, दररोज कामाचा आढावा घेतला जात आहे. पुढील चार महिन्यांत हे कामकाज पूर्णत्वास जाण्याची अपेक्षा आहे.
>
> **- संजय काशिद, कार्यकारी अभियंता, महापालिका.**

> कमानीचे कामकाज लवकरात-लवकर पूर्ण होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे सतत पाठपुरावा करत आहोत. परंतु, दगडाचे कामकाज असल्याने उशीर होत असल्याचे सांगितले जात आहे. पुढील चार ते पाच महिन्यांत हे कामकाज पूर्णत्वास नेण्यासाठीची चर्चा झाली आहे. त्यानुसार हे कामकाज लवकरात-लवकर मार्गी लागून देहू-आळंदी रस्त्यावरील जगद्गुरु संत तुकाराम महाराज प्रवेशद्वार तयार होणार आहे.
>
> **- प्रवीण भालेकर, नगरसेवक**

## शालेय साहित्य दरात ३०-४०% वाढ; पालकांचे बजेट कोलमडले

पिंपरी (दै. संध्या)

नवीन शैक्षणिक वर्षाच्या तोंडावर शहरातील बाजारपेठामध्ये शालेय साहित्य दरात ३० ते ४० टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे शालेय साहित्य खरेदी करताना पालकांचा खिसा खाली होऊ लागला आहे. यावर्षी वह्या, पुस्तके, दप्तर, गणवेश, शूज या साहित्यांच्या किमतीत वाढ झाल्याने पालकांचे आर्थिक बजेट डबघाईस आले आहे. कागद छपाई, वाहतूक आणि मालाच्या वाढलेल्या किमतीचा थेट परिणाम शालेय साहित्याच्या दरवाढीत झाला आहे. यावर्षी शालेय गणवेशाचे दर ३० टक्क्याने वाढले आहेत. यावर्षी चांगल्या प्रतीचे पुस्तके १०० ते ११० रुपयांपर्यंत पोहोचली आहेत. फुलस्केप नोटबुकच्या किमतीचे भाव २० ते २५ टक्क्यांनी वाढले आहेत. तसेच शालेय दप्तर, रेनकोट आणि प्लास्टिक बाटल्यांच्या किमतीत ही सर्वाधिक ४० टक्के वाढ झाली आहे. वाढलेल्या खर्चामुळे शालेय साहित्याच्या किमतीत वाढ झाल्याचे पुस्तक विक्रेते सांगतात. या महागाईमुळे पुस्तकांच्या किमती वाढल्या आहेत. तरी मुलांना शालेय साहित्य खरेदी करावे लागत आहे. सध्या महागाई वाढली आहे त्यामुळे वह्या, पुस्तके, दप्तर, गणवेश, पेन, शूज महाग झाले आहेत.

## महापालिका शाळांमधील पाण्याच्या टाक्यांची तातडीने स्वच्छता करा

### नगरसेवक विश्वजीत बारणे यांची आयुक्तांकडे मागणी

पिंपरी (दै. संध्या)



नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच पिंपरी चिंचवड महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मनपा हद्दीतील अनेक शाळांमधील पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची शाळा सुरू होण्यापूर्वी नियमित स्वच्छता व निर्जंतुकीकरण झाले नसल्याची माहिती समोर आली आहे. याबाबत नगरसेवक तथा शिवसेना गटनेते विश्वजीत श्रीरंग बारणे यांनी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना पत्र देऊन तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर अस्वच्छ पाण्याच्या टाक्यांमधून दूषित पाण्याचा धोका वाढला असून विद्यार्थ्यांना गॅस्ट्रो, कावीळ तसेच पोटाच्या विविध आजारांना सामोरे जावे लागू शकते. विद्यार्थ्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवणे ही महापालिकेची जबाबदारी असून याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे बारणे यांनी पत्रात नमूद केले आहे.

महापालिका हद्दीतील सर्व शाळांमधील पाण्याच्या टाक्यांची तात्काळ स्वच्छता करून त्यांचे योग्य प्रकारे निर्जंतुकीकरण करावे. तसेच पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी आरोग्य व शिक्षण विभागाला तातडीचे आदेश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

"विद्यार्थ्यांना शुद्ध आणि सुरक्षित पाणी मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. कोणत्याही प्रकारचा आरोग्याचा धोका निर्माण होऊ नये यासाठी महापालिकेने त्वरित उपाययोजना कराव्यात," असे विश्वजीत बारणे यांनी सांगितले.

## भीमाशंकर मंदिर आजपासून दर्शनासाठी सुरु

**दर्शनाकरिता पास अनिवार्य-जिल्हा प्रशासनाची माहिती**

पिंपरी (दै. संध्या)



भीमाशंकर मंदिर आजपासून दर्शनासाठी सुरु झाले असून मंदिरात प्रतिदिन एक हजार भाविकांना प्रवेश देण्यात येणार आहे. भाविकांनी दर्शनासाठी मंदिर व्यवस्थापन समितीच्या https://shreebhimashankar.com या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर पास उपलब्ध होणार आहे. नोंदणीकृत भाविकांची यादी संकेतस्थळावर होणार असून दर्शनाकरिता पास अनिवार्य करण्यात आल्याचे माहिती जिल्हा प्रशासनाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

भाविकांना ३० जून २०२६ पर्यंत दररोज सकाळी ७ ते ११ वा. दर्शन सुविधा उपलब्ध असणार आहे. ऑनलाईन नोंदणी केलेल्या भाविकांनी दर्शनासाठी येताना वैध ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य करण्यात आले आहे. भाविक तसेच स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मंदिर संस्थान, जिल्हा प्रशासन, पोलीस प्रशासन व स्थानिक प्रशासन यांना सहकार्य करावे.

सन 2027 मधील नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, प्रयागराज महाकुंभ 2025 च्या अनुभवाच्या आधारे नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या भाविकांपैकी मोठ्या संख्येने भाविक श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भेट देण्याची शक्यता आहे. संभाव्य वाढत्या गर्दीच्या अनुषंगाने भाविकांसाठी आवश्यक सुविधा उभारणीची कामे सध्या प्रगतीपथावर आहेत.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र भीमाशंकर येथे नवीन सभामंडप व पायरी मागचि काम सुरु असल्याने, देवस्थान ट्रस्टने ९ जानेवारी २०२६ पासून मंदिर दर्शनासाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. सदर बंद कालावधीस ३१ मे २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. मुख्य मंदिरासमोरील सभामंडपाचे काम पूर्ण करण्यासाठी सामान्य परिस्थितीत सुमारे एक वर्षाचा कालावधी अपेक्षित होता. तथापि, भिमाशंकर संस्थान, स्थानिक ग्रामस्थ आणि भाविक यांच्या सहकार्यामुळे तसेच रात्रंदिवस अखंड काम सुरु ठेवण्यात आल्याने हे काम केवळ पाच महिन्यांत पूर्णत्वास येत आहे.

> मुख्य सभामंडपाचे काम पूर्ण करण्यात आले असून दर्शनबारी उभारणी, परिसर स्वच्छता, भाविकांसाठी सुविधा व गर्दी व्यवस्थापनासाठी आवश्यक पायाभूत कामे पूर्ण झाली आहे. सर्व कामे अंतिम टप्प्यात असून उर्वरित किरकोळ कामे जलदगतीने पूर्ण करुन बांधकाम साहित्य, दगड व यंत्रसामग्री हटवून परिसर भाविकांसाठी मोकळा करण्याच्यादृष्टीने श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान ट्रस्ट यांनी आजपासून दर्शनाकरिता खुले करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्यावतीने

## हॉटेल्सला रेटिंग देणं पडलं महागात

**■ ७ लाख ९४ हजारांची फसवणूक; पिंपरी पोलिसांत गुन्हा दाखल**

पिंपरी (दै. संध्या)

हॉटेल्सला ऑनलाइन रेटिंग देऊन आर्थिक फायदा मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका ४१ वर्षीय व्यक्तीची तब्बल ७ लाख ९४ हजार ३९२ रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांना एका अज्ञात व्यक्तीने संपर्क साधून 'फाइव्ह स्टार हॉटेलला रेटिंग देण्याच्या टास्कमध्ये सहभागी झाल्यास चांगला आर्थिक फायदा मिळेल' असे सांगितले. त्यानंतर विविध टास्क पूर्ण करण्याच्या नावाखाली आरोपींनी फिर्यादीचा विश्वास संपादन केला. आर्थिक लाभाचे आमिष दाखवत आरोपींनी फिर्यादीला वेगवेगळ्या यूपीआय आयडीवर पैसे पाठविण्यास सांगितले. त्यानुसार फिर्यादीने टप्प्याटप्प्याने रक्कम जमा केली. मात्र नंतर कोणताही परतावा न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले.

हा प्रकार २२ नोव्हेंबर २०२५ ते २३ डिसेंबर २०२५ या कालावधीत शिवदत्तनगर, पिंपरी गाव परिसरात घडला. फसवणुकीची तक्रार दाखल झाल्यानंतर पिंपरी पोलिसांनी माहिती तंत्रज्ञान अधिनियमासह संबंधित कलमांन्वये गुन्हा नोंदविला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अधिकारी पोलीस निरीक्षक पाटील करीत आहेत. पोलिसांनी नागरिकांना ऑनलाइन गुंतवणूक, टास्क पूर्ण करून पैसे कमावणे किंवा रेटिंग देण्याच्या बदल्यात मोठ्या नफ्याचे आमिष दाखविणाऱ्या अनोळखी व्यक्तींवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले आहे.

## पुरस्कार वितरण, पुस्तक प्रकाशन व कवी संमेलन संपन्न

निगडी (दै. संध्या)



प्राधिकरण येथील स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहात काव्यानंद प्रतिष्ठान तर्फे विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले त्यावेळी उद्घाटक म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्री. सदानंद मोरे उपस्थित होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ज्येष्ठ साहित्यिक व संत चित्रकार श्री. वि. ग. सातपुते उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक श्री. सूर्यकांत वैद्य आणि जळगाव येथील डॉ. श्रीकांत तारे उपस्थितीत होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन संपन्न झाले. सुभाष चव्हाण यांनी सभागृहात शंखनाद केला.गणेश वंदना अकलूज येथील कवयित्री कविता ढोबळे यांनी गायली. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक काव्यानंद चे संस्थापक अध्यक्ष सुनिल खंडेलवाल यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुंबई येथील लेखिका व कवयित्री वंदना ताम्हाणे यांनी केले. सन २०२४ चा स्व. चिंतामणराव पोटे काव्यमित्र पुरस्कार पुणे येथील कवीवर्य श्री. हरिश्चंद्र कोठावदे यांच्या ऐलपैल या काव्यसंग्रहास देण्यात आला तर सन २०२५ चा स्व. चिंतामणराव पोटे काव्यमित्र पुरस्कार सिल्लोड जि. छत्रपती संभाजी नगर येथील शिक्षक कवीवर्य श्री राजू आठवले यांच्या प्रेमांकुर या कविता संग्रहास देण्यात आला. सन २०२५ चा स्व. निर्मलादेवी खंडेलवाल काव्य सन्मान रत्नागिरी येथील कवयित्री डॉ. चित्रा गोस्वामी यांच्या कश्ती या काव्यसंग्रहास देण्यात आला. काव्यानंद तर्फे घेण्यात आलेल्या कविता स्पर्धा २०२६ चे पारितोषिक वितरण करण्यात आले.

## घोटाळा तापला

पुणे (दै. संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील विविध प्रकारांचे घोटाळे चव्हाट्यावर आल्यानंतर त्यांच्या चौकशीला कात्रजचा घाट दाखवून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने (एसआरए) मात्र मोघम खुलासे करत या घोटाळ्यांवर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला आहे. एसआरएचे अधिकारीच आता या घोटाळेबाज अधिकाऱ्यांना वाचवण्याचे काम करत असल्याचे समोर आले आहे. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या नावाखाली एसआरएच्या अधिकाऱ्यांनी काही बिल्डरांना हाताशी धरून पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत हजारो कोटींचे टीडीआर घोटाळे केले असल्याचे उघडकीस आणले. यामध्ये मिलिंदनगर एसआरए, विठ्ठलनगर-नेहरूनगर एसआरए, पिंपरी सॅनिटरी चाळ अशा काही योजनांचा समावेश आहे.

## राज ठाकरे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा

पिंपरी (दै. संध्या)



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवड शहर मनसेच्या वतीने विविध सामाजिक आणि लोकोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. शहरभर उत्साहाचे वातावरण असून मनसैनिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

वाढदिवसानिमित्त सकाळी चिंचवड गावातील मोरया गोसावी मंदिरात विशेष अभिषेक व प्रार्थना करण्यात आली. यावेळी राजसाहेब ठाकरे यांच्या दीर्घायुष्यासाठी आणि उत्तम आरोग्यासाठी मनसैनिकांनी प्रार्थना केली. त्यानंतर सकाळी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएम हॉस्पिटल येथे उपचार घेत असलेल्या रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात मनसेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मनसैनिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

भोसरी-मोशी शाखेच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरालाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेक कार्यकर्त्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

समाजोपयोगी कार्यातून वाढदिवस साजरा करण्याची मनसेची परंपरा यानिमित्ताने पुन्हा अधोरेखित झाली. याशिवाय, येत्या २१ जून रोजी निगडी येथील प्रभाग क्रमांक १३ मध्ये इयत्ता दहावी आणि बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला असून, विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करण्यात येणार आहे.

या सर्व कार्यक्रमांचे आयोजन मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. यावेळी शैलेश पाटील, राजू साळवे, आकाश सागरे, परमेश्वर चिल्लरगे, संतोष यादव, विक्रम भोसले, सुनील कदम, नारायण पठारे, महादेव लोखंडे, सागर बहुले, दत्ता डांगे, जितेश वाल्हेकर, चेतन कुलकर्णी, जयसिंग भाट यांच्यासह शेकडो मनसैनिक उपस्थित होते. राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या विविध सामाजिक उपक्रमांमुळे पिंपरी-चिंचवड शहरात उत्साहाचे आणि सामाजिक बांधिलकीचे वातावरण निर्माण झाले होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### दिव्यांगांच्या रेल्वे प्रवासातील समस्यांबाबत पत्रकार उत्कर्ष समितीचे निवेदन

डोंबिवली (दैनिक संध्या) : दिव्यांग प्रवाशांना रेल्वे प्रवासादरम्यान भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबत पत्रकार उत्कर्ष समितीने पुढाकार घेत डोंबिवली रेल्वे सुरक्षा बल आणि रेल्वे पोलीस विभागाकडे निवेदन सादर केले. समितीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. अशोक म्हात्रे व प्रदेश संघटक गुरुनाथ तिरपणकर यांनी दिव्यांग बांधवांसह संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्या अडचणी मांडल्या. पत्रकार उत्कर्ष समिती ही पत्रकारांच्या हितासाठी कार्य करत असतानाच सामाजिक बांधिलकी जपत समाजातील सर्व स्तरांतील घटकांच्या प्रश्नांसाठीही सातत्याने प्रयत्नशील आहे. मध्य रेल्वेच्या स्थानिक गाड्यांमध्ये दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या डब्यांमध्ये अनेक सक्षम नागरिक प्रवास करत असल्याने दिव्यांग प्रवाशांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत असल्याची बाब समितीच्या निदर्शनास आली होती. दिव्यांग बांधव सचिन गरुड, पुष्कर चिंवडकर आणि गुलाब आव्हाड यांनी रेल्वे प्रवासात येणाऱ्या समस्यांबाबत डॉ. अशोक म्हात्रे यांच्याकडे तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेत डॉ. म्हात्रे यांनी मागील आठवड्यात मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे याबाबत पाठपुरावा केला होता. याच अनुषंगाने आज डोंबिवली येथील रेल्वे सुरक्षा बल व रेल्वे पोलीस विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेण्यात आली. दिव्यांग प्रवाशांना राखीव डब्यांमध्ये प्रवास करताना भेडसावणाऱ्या अडचणींबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी रेल्वे पोलीस अधिकारी श्री. पाल व श्री. तुळे यांनी दिव्यांगांसाठी राखीव डब्यात अनधिकृतपणे प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कठोर कारवाई करण्यात येईल, तसेच अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्यात येतील, असे आश्वासन दिले. दिव्यांग प्रवाशांच्या हक्कांसाठी पत्रकार उत्कर्ष समितीने घेतलेल्या या पुढाकाराचे दिव्यांग बांधवांनी स्वागत केले असून, रेल्वे प्रशासनाने याबाबत प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.



### माळेगाव कॉलनी शाळेमध्ये शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहात साजरा

बारामती (दैनिक संध्या) : शैक्षणिक वर्ष 2026-2027 ची सुरुवात दिनांक 15/06/2026 रोजी सुरूवात होत असल्याने बारामती नगरपरिषदेच्या सर्व 17 शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम - 2026 चे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी आश्विनी सुरज सातव (नगरसेविका-बा.न.प),श्री. कृष्णमुर्ती जगताप (अध्यक्ष-शाळा व्यवस्थापन समिती माळेगाव कॉलनी),श्री. कल्याण पाचांगणे (माजी अध्यक्ष) व पालक वर्ग मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मुर्ती पूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.माळेगाव कॉलनी व आसपासच्या परिसरातील पहिली ते सातवी इयत्तेच्या नवीन विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेशोत्सव विद्यार्थ्यांचे औक्षण करून खाऊ वाटप व सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमासाठी श्री.गजानन सरगर (मुख्याध्यापक),श्री.भैरवनाथ पर्वते,कल्पना चौधरी,प्रज्ञा शेंडे, कोमल जाधव,मनीषा जाधव-गोरे,नंदा जगताप यांनी विशेष परिश्रम घेतले.



### सोमवती अमावस्ये निमित्त श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांना कऱ्हास्नान

पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्याच्या पुर्व भागातील नायगाव येथील श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची पालखी सोमवती आमवस्ये निमित्त पांडेश्वर(ता.पुरंदर) येथे कऱ्हा स्नानासाठी गेली होती.सकाळी श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची महापुजा पुजारी दिपक जगताप यांनी बांधली. त्यानंतर महाआरती करण्यात आली.आमवस्ये निमित्त श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची पालखी नायगाव येथुन पांडेश्वर कडे प्रस्थान झाली. यावेळी गावातील ग्रामस्थ, तरुण, मुले मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पालखी पांडेश्वर या ठिकाणी घेल्यानंतर श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांना ग्रामस्थांनी स्नान घातले.त्यानंतर श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची आरती झाली.पांडेश्वर येथे सोमवती अमावस्ये निमित्त राजुरी व पांडेश्वर येथील ही देवांच्या पालख्या आल्या होत्या.त्यांना ही भाविकांनी स्नान घातले व त्यांच्या ही आरती करण्यात आल्या. श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची पालखी परत माघारी येत असताना पांडेश्वर येथील रहीवाशी शेंडगे बंधु यांच्या वतीने ग्रामस्थांना महाप्रसाद देण्यात आला.अनेक भाविकांनी चहा पाण्याची सोय केली होती.नायगाव मधील चौंडकरवाडी येथील ग्रामस्थांच्या वतीने बेसन भाकरीचा महाप्रसाद देण्यात आला .त्यानंतर श्री सिद्धेश्वर महाराज व माता जोगेश्वरी यांची पालखी नायगाव कडे प्रस्थान झाली.नायगाव मध्ये आल्यानंतर ग्रामप्रदिक्षणा होऊन पालखी मंदिरात गेली व त्यानंतर आरती होऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

### चारा-पाणीटंचाईने शेतकरी हवालदिल

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागात सध्या भीषण पाणी आणि चारा टंचाई निर्माण झाली आहे. वाढत्या उन्हामुळे तालुक्यातील विहिरी, पाझर तलाव आणि कूपनलिका कोरड्या पडल्या असून भूजल पातळी कमालीची खाली गेली आहे. यामुळे शेतकरी आणि पशुपालक हवालदिल झाले आहेत. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, टँकरच्या फेऱ्या वाढवाव्यात आणि दीर्घकालीन जलसंधारण व उपाययोजना राबवाव्यात अशी एकमुखी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. पेमदरा, शिंदेवाडी, नळवणे यांसारख्या गावांमध्ये पाण्याचे सर्व नैसर्गिक स्रोत आटल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न बिकट झाला आहे. अनेक गावांना सध्या टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे.या बिकट परस्थितीत पै.सोपानराव कणसे युवा प्रतिष्ठान आणि क्रिएटिव्ह ग्लोबल फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा जिल्हा परिषद सदस्या स्मिता कणसे यांच्या वतीने स्वतःचा टँकर मोफत सुरू करण्यात आला आहे.

# गुटखा तस्करी प्रकरणातील फरार आरोपी अखेर जेरबंद

## पाच वर्षे पोलिसांना गुंगारा; शिक्रापूर पोलिसांची धडाकेबाज कारवाई

शिक्रापूर (दै. संध्या)




सुमारे ७८ लाख रुपयांच्या गुटखा तस्करी प्रकरणात गेल्या पाच वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला शिक्रापूर पोलिसांनी अखेर बेड्या ठोकत मोठे यश मिळवले आहे. गुन्हा दाखल झाल्यापासून पोलिसांना हुलकावणी देणारा आरोपी तीन दिवसांच्या पाठलागानंतर चाकण येथून पोलिसांच्या जाळ्यात अडकला. दि. ८ जुलै २०२१ रोजी बेकायदेशीर गुटखा विक्रीसाठी वाहतूक व साठवणूक करण्यात येत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी कारवाई करत सुमारे ७८ लाख रुपयांचा गुटखा व इतर मुद्देमाल जप्त केला होता. या प्रकरणी दि. ९ जुलै २०२१ रोजी बापू उर्फ प्रवीण शंकर गवते याच्यासह एकूण १३आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, गुन्हा दाखल होताच आरोपी बापू उर्फ प्रवीण शंकर गवते (वय २२ वर्षे) रा.गवते वस्ती, चाकण,ता. खेड) हा फरार झाला होता. गुन्हा घडला त्यावेळी तो गुटखा वाहतूक करणाऱ्या वाहनाचा चालक असल्याचे तपासात समोर आले होते. त्यानंतर पोलिसांनी त्याचा अनेकदा शोध घेतला, मात्र तो सतत ठिकाणे बदलून पोलिसांना चकवा देत होता. दरम्यान, फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी शिक्रापूर पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली असता आरोपी चाकण परिसरात असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तीन दिवस सातत्याने पाठलाग करून आणि तांत्रिक तसेच स्थानिक माहितीच्या आधारे सापळा रचत आरोपीला गवते वस्ती, चाकण येथून ताब्यात घेतले. पाच वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला अटक करण्यात शिक्रापूर पोलिसांना यश आल्याने गुटखा तस्करीविरोधातील कारवाईला आणखी बळ मिळाले आहे. अटक आरोपी सध्या पोलिस कोठडीत असून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली त्याच्याकडे सखोल चौकशी सुरू आहे. या गुन्ह्याशी संबंधित इतर बाबी, आर्थिक व्यवहार आणि आरोपींच्या नेटवर्कचा तपासही पोलीस करीत आहेत.

गुन्हा कितीही जुना असला, तरी कायद्याचा हात लांब असतो याची प्रचिती पुन्हा एकदा या कारवाईतून आली असून पाच वर्षे फरार राहिलेला आरोपी अखेर शिक्रापूर पोलिसांच्या तावडीत सापडला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल,अपर पोलीस अधीक्षक शुभम कुमार,उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव,सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख,सोमनाथ कचरे,पोलीस अंमलदार गणेश येळवंडे,नवनाथ केंद्रे,मयूर कुंभार यांनी केली आहे.

## एनसीएमसी कार्डशिवाय एसटी प्रवास नाही

नारायणगाव (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) सवलतीच्या दरात प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी एक मोठा निर्णय घेतला आहे. या नवीन नियमाची अंमलबजावणी १ ऑगस्ट २०२६ पासून पूर्ण राज्यात होणार आहे. राज्यातील सवलतीच्या प्रवास योजनांचा लाभ घेण्यासाठी हे कार्ड आवश्यक राहणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. 'महिला सन्मान योजने'अंतर्गत ५०% सवलत घेणाऱ्या महिला आणि 'अमृत ज्येष्ठ नागरिक योजने'अंतर्गत मोफत प्रवास करणाऱ्या ७५ वर्षांवरील नागरिकांना हे कार्ड आता सोबत ठेवावे लागेल.मोफत प्रवासाची सुविधा असलेल्यांना कार्ड काढताना केवळ २ रुपये सेवा शुल्क आकारले जाणार आहे. १ ऑगस्टपासून कार्डाशिवाय सवलतीचा लाभ मिळणे कठीण होणार आहे. नारायणगाव आणि इतर आगारांमध्ये कार्ड बनवण्यासाठी विशेष केंद्र सुरू करण्यात आली आहेत. दरम्यान नारायणगाव आगारात एमसीएमसी कार्ड काढण्यासाठी अधिकृत केंद्र असून येथे नागरिक कार्ड साठी नोंदणी करू शकतात. आतापर्यंत 8785 लाभार्थ्यांची कार्डे तयार करण्यात आली असून 5154 कार्डांचे वितरण करण्यात आले असल्याचे सुविधा केंद्राकडून सांगण्यात आले. जून महिन्यापासून शाळा सुरू झाल्यानंतर शालेय विद्यार्थी तसेच दिव्यांग प्रवाशांनाही एनसीएमसी कार्ड काढणे आवश्यक होणार असल्याची माहिती संबंधिताकडून देण्यात आली आहे.

## वर्धापन दिन कार्यक्रमाला हिंगोली जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची दांडी?

हिंगोली (दै. संध्या)

मुंबई येथील षण्मुखानंद सभागृहात दि. ११ जून २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या निधनानंतरचा हा पक्षाचा पहिलाच मोठा मेळावा असल्याने या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. तसेच हा वर्धापन दिन सोहळा स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतीस समर्पित करण्यात आला होता. राष्ट्रीय अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमास राज्यभरातील मंत्री, आमदार, लोकप्रतिनिधी, जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. मात्र, हिंगोली जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक तसेच इतर प्रमुख पदाधिकारी या कार्यक्रमात अनुपस्थित असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. हिंगोली जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे मजबूत संघटन अस्तित्वात असताना या महत्त्वपूर्ण पक्षीय कार्यक्रमात जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी दिसून आले नाहीत. तसेच त्यांच्या सोशल मीडिया खात्यांवरही कार्यक्रमासंदर्भातील कोणतीही पोस्ट अथवा उपस्थितीची नोंद आढळून आलेली नाही. यामुळे पक्षाच्या वर्धापन दिनासारख्या महत्त्वाच्या कार्यक्रमाकडे हिंगोली जिल्ह्यातील नेतृत्वाने दुर्लक्ष केले का? अथवा जिल्ह्यातील पक्ष संघटनेत नेमके काय सुरू आहे? असा प्रश्न कार्यकर्ते आणि राजकीय निरीक्षकांमधून उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर हिंगोली जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाने आपली भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी पक्ष कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## जुन्नर तालुक्यात 'खेत बचाओ' अभियानाला मोठा प्रतिसाद

नारायणगाव (दै. संध्या)



भारतीय कृषी अनुसंधान परिषद , नवी दिल्ली यांच्या वतीने जुन्नर तालुक्यात 'खेत बचाओ' अभियान उत्साहात पार पडले. तालुक्यातील गोळेगाव, अलदरे, पिंपळगाव सिद्धनाथ, चिंचोली , पारुंडे आणि वैष्णवधाम यांसारख्या विविध गावांमध्ये या मोहिमेअंतर्गत शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात तज्ज्ञांनी जमिनीचे आरोग्य आणि नैसर्गिक शेतीचे महत्त्व यावर विशेष भर दिला. मुख्य मार्गदर्शक डॉ. अशोककुमार भारीमल यांनी जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी नैसर्गिक शेती कशी फायदेशीर आहे, याबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच, शासकीय योजनांची माहिती देऊन शेतकऱ्यांनी त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले .

जुन्नर येथील उपक्रमांत शास्त्रज्ञ डॉक्टर अशोककुमार भारीमल, मुख्य तांत्रिक अधिकारी शरदराव कोकणे, डॉ. कनिका शर्मा, कृषीभूषण श्रीराम गाढवे, कृषी अधिकारी बापूसाहेब रोकडे, फोरकास्ट अग्रोटेकचे डॉ. संतोष सहाणे, कृषी सहाय्यक अमोल मोरे,मृदा शास्त्रज्ञ योगेश यादव आणि अन्य कृषी तज्ज्ञांनी शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले.

हे अभियान यशस्वी करण्यासाठी 'फोरकास्ट अॅग्रोटेक इनोव्हेशन' आणि 'डिसेंट फाउंडेशन' यांनी तांत्रिक व आर्थिक सहकार्य केले.

यावेळी सरपंच मयूर पवार, माजी सरपंच सुरेश गायकवाड, सदाशिव ताजने, रमेश मेहेर, दीपक सरजीने, कृषीमित्र प्रवीण गाडेकर, दत्तात्रय ताजने ,उत्तम काशीद, जयवंत डोके, दीपक कोकणे, राजेंद्र भगत, अशोक व्हाडी, सत्यवान खंडागळे ,गणेश मेहेर आदी मान्यवर उपस्थित होते.

गावातील मान्यवर आणि प्रगतशील शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या मोहिमेमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये आधुनिक आणि शाश्वत शेतीबद्दल मोठी जागरूकता निर्माण झाली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एफ. बी. सातार यांनी केले, तर आभार माजी उपसरपंच भरत जाधव यांनी मानले.

## बेल्हे मॉर्डन इंग्लिश स्कूलने तयार केले ५०० सिडबॉल

नारायणगाव (दै. संध्या)

बेल्हे येथील मॉर्डन इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने वृक्षलागवडीसाठी जवळपास ५०० सीडबॉल तयार केले असून, पाऊस पडल्यानंतर त्याची परिसरातील वनविभागाच्या मोकळ्या जागेत तसेच विद्यार्थ्यांना घरी देऊन त्याची लागवड करण्यात येणार आहे. बेल्हे येथील मॉर्डन इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी या सीडबॉल निर्मितीसाठी, देशी वृक्षांच्या बीयांचा चिंच, कडुनिंब, करंज, जांभुळ, शेवगा, सीताफळ, आंबा आदींचा वापर केला. सीडबॉल निर्मितीसाठी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सीडबॉल तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी घरून चाळून माती आणली. त्यात टाकण्यासाठी बिया आणल्या व शाळेच्या मैदानात सीडबॉल तयार केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शाळेमध्ये 'पर्यावरण सप्ताह' आयोजित केला होता. शालेय परिसरातील झाडांना पाणी देणे व खोडा सभोवतालचा परिसर स्वच्छ करणे, पर्यावरण संवर्धन विषयक चित्र काढणे व पोस्टर तयार करणे, पर्यावरण विषयी चित्रफीत दाखवणे, पथनाट्य सादर करणे, विद्यार्थ्यांची भाषणे तसेच तज्ञ पर्यावरण विषयी मार्गदर्शन, सीडबॉल तयार करणे, झाडे लावणे असे उपक्रम या निमित्ताने राबवण्यात आले. यावेळी संस्थेचे सीईओ शैलेश ढवळे, विश्वस्त दावला कणसे, प्राचार्य विद्या गाडगे, उपप्राचार्य के. पी.सिंग आदी उपस्थित होते.

## नव्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण



नारायणगाव (दै. संध्या)

नगदवाडी ता.जुन्नर येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेत शैक्षणिक वर्ष 2026/27 च्या पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीत प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना पाठ्यपुस्तके,शालेय गणवेश, शैक्षणिक साहित्य,खाऊ,गुलाबपुष्प व फुगे देऊन स्वागत करण्यात आले.अशी माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला बोऱ्हाडे यांनी दिली. कार्यक्रमाच्या निमित्ताने पुणे जिल्हा परिषद पुणेच्या सदस्या कल्पनाताई वैभवकुमार काळे, नगदवाडी केंद्राच्या केंद्रप्रमुख वनिता हांडे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष दिनेश बढे,शाळा सल्लागार समिती अध्यक्ष सुरेश बढे,नगदवाडी विविध कार्यकारी सोसायटी अध्यक्ष पोपटराव बढे,शाळा व्यवस्थापन समिती सदस्या संगीता बढे,दिपाली जाधव,रघुनाथ बढे,दिनेश कुतळ, विकास बढे,दिनेश घाडगे,दयानंद बढे,संतोष बढे,बाबाजी बढे,संकेत कुतळ आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन मंगेश मेहेर,पंडित चौगुले,निलेश शेलार,विद्या वाघ,आशा आरेकर व उज्वला कांबळे या शिक्षकांनी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश मेहेर यांनी केले तर आभार निलेश शेलार यांनी मानले.



## जागतिक रक्तदान दिनानिमित्त ८०६ जणांचे रक्तदान

उरुळी कांचन (दै. संध्या)

जागतिक रक्तदान दिनानिमित्त उरुळी कांचन येथे ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशनच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर व 'प्लास्टिक बँक' उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. बी. जी. शिर्के प्राथमिक शाळेत झालेल्या या कार्यक्रमात तब्बल ८०६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी उरुळी कांचनसाठी प्रस्तावित घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी आवश्यक जागेबाबत सकारात्मक निर्णय झाल्याची माहिती देण्यात आली. जिल्हा परिषद अध्यक्ष विरधवल जगदाळे व मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी प्रकल्पासाठी प्रशासनाकडून सहकार्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलताना महात्मा गांधी सर्वोदय संघाचे उपाध्यक्ष के. डी. कांचन यांनी प्रकल्पासाठी आवश्यक जागा उपलब्ध करुन देण्यास सकारात्मक प्रतिसाद दिला. कार्यक्रमात 'प्लास्टिक बँक' या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत नागरिकांनी घरातील स्वच्छ व वर्गीकृत प्लास्टिक कचरा जमा करायचा असून त्याबदल्यात प्रोत्साहनपर मोबदला दिला जाणार आहे. गृहिणींना एक किलो स्वच्छ प्लास्टिकच्या बदल्यात एक किलो साखर, तर विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल, कंपास बॉक्स आदी शालेय साहित्य देण्यात येणार आहे. पर्यावरण संवर्धनासह कचरा व्यवस्थापनाबाबत जनजागृती करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

### 'प्लास्टिक बँक' उपक्रमाचा शुभारंभ

या कार्यक्रमासाठी ड्रीम्स युवा सोशल फाउंडेशनचे ग्रामदूत, स्वयंसेवक आणि स्थानिक नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाच्या उभारणीसंदर्भात सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याने 'कचरा-मुक्त उरुळी कांचन' या स्वप्नपूर्तीसाठी महत्त्वाचा टप्पा पार पडल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋषीकेश भालेराव यांनी केले. प्रास्ताविक संतोष चौधरी यांनी, तर आभार प्रदर्शन मंदार खरात यांनी केले. तसेच कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, रक्तदाते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.






दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# थोडक्यात पण महत्वाचे



## शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

पुणे (दैनिक संध्या) : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत कार्यरत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह, इंदापूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेला ऑनलाईन पद्धतीने सुरुवात झाली आहे. दुधगंगा दुध डेअरी समोर, जुना अकलूज पुणे बायपास, इंदापूर येथे असलेल्या या वसतिगृहात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती-भटक्या जमाती, आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग, दिव्यांग व अनाथ विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार आणि शासनाने निर्धारित केलेल्या आरक्षणानुसार प्रवेश दिला जाणार आहे. इयत्ता आठवीपासून पुढील शिक्षण घेणारे तसेच कनिष्ठ महाविद्यालय, बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र आहेत.प्रवेशित विद्यार्थ्यांना विनामूल्य निवास व भोजन, क्रमिक पुस्तके, शैक्षणिक साहित्य, गणवेश, शैक्षणिक सहलीसाठी आर्थिक सहाय्य तसेच दरमहा एक हजार रुपये निर्वाह भत्ता विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केला जातो.

## ऑपरेशन टायगरबाबत मोठी माहिती समोर!

मुंबई (दैनिक संध्या) : राज्याचा राजकारणात पुन्हा मोठा भूकंप होण्याची शक्यता आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे काही खासदार एकनाथ शिंदे यांच्या पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चा रंगली आहे. अशातच आता ऑपरेशन टायगरबाबत सर्वात मोठी अपडेट समोर आली आहे. शिवसेनेच्या एका आमदाराने उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे तब्बल 7 खासदार एकनाथ शिंदेंच्या संपर्कात असल्याचे विधान केले आहे. तसेच आगामी काळात लवकरच हे खासदार शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचेही या नेत्याने म्हटले आहे. शिवसेनेचे आमदार कृपाल तुमाने यांनी ऑपरेशन टायगरबाबत मोठं विधान केले आहे. तुमाने म्हणाले की, 'उबाठामध्ये फारच असंतोष आहे. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर सात खासदारांचा विश्वास आहे. त्यांच्या मतदारसंघाचा विकास करायचा असेल तर एकनाथ शिंदे सारखा कर्तव्यनिष्ठ नेता समाजाला न्याय देऊ शकतो असा त्यांना विश्वास आहे. त्यामुळे लवकरच ऑपरेशन टायगर यशस्वी झालं याची बातमी मिळेल. चर्चा सुरू नाही तर सर्वकाही ठरलं आहे. सर्व चौकशी झाली आहे. फक्त लवकरच ऑपरेशनची तारीख बाकी आहे. लवकरच ऑपरेशन टायगर यशस्वी झालं याची बातमी मिळेल.' शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने काल आपल्या खासदारांची बैठक बोलावली होती, या बैठकीला काही खासदार ऑफलाईन तर काही खासदार ऑनलाईन पद्धतीने हजर होते. मात्र आता काही खासदार पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या कार्यपद्धतीवर नाराज असल्याचे बोलले जात आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे खासदारांना भेटत नाहीत, या खासदारांना मदत केली जात नाही.

# ठाण्यात मनपा शाळांचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

## 'टेन्शन घ्यायचं नाही, बिंधास्त अभ्यास करा!' उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जागवल्या पालिकेच्या शाळेतील आठवणी



■ ठाणे (दै. संध्या)

"नवीन वर्गात आल्यावर मनात शिक्षणाची किंवा वातावरणाची कोणतीही भीती बाळगू नका. 'टेन्शन गया पेन्शन देनेको' असे समजा आणि कोणत्याही दडपणाशिवाय बिंधास्तपणे अभ्यास करा. तुमची जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतच तुम्हाला आयुष्यात उत्तुंग यश मिळवून देईल," असा मोलाचा आणि आश्वासक सल्ला राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

उन्हाळ्याची मोठी सुट्टी संपल्यानंतर आज ठाणे महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये 'शाळा प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. किसननगर येथील पालिका शाळा क्रमांक २३ मध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत नवा कोरा गणवेश, हातात पुस्तके आणि गुलाबपुष्प देऊन बालचमूला शालेय प्रवासाच्या पहिल्या दिवशी अनोखी पावती देण्यात आली.

या दिमाखदार सोहळ्याला ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर, शिवसेना गटनेते पवन कदम, नगरसेवक राम रेपाळे, नगरसेविका संध्या मोरे, सुखदा मोरे, एकता भोईर, डॉ. दर्शना भोईर, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, शिक्षणाधिकारी शेषराव बढे आणि मुख्याध्यापक दीपक मोराणकर यांच्यासह ठाण्यातील अनेक लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी, शिक्षक, पालक व बालचमू मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, वाढत्या स्पर्धेच्या युगात सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांनी मनात अजिबात न्यूनगंड बाळगू नये. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, थोर शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम ही मोठी व्यक्तिमत्त्वे सरकारी आणि जिल्हा परिषदेच्या शाळांमधूनच शिकून पुढे आली आहेत. शाळेची इमारत वातानुकूलित असण्यापेक्षा किंवा तिथली फी जास्त असण्यापेक्षा तिथे दिले जाणारे शिक्षण आणि शिक्षकांची बांधिलकी सर्वात महत्त्वाची असते, असे मत त्यांनी मांडले. केवळ पुस्तकी ज्ञानावर भर न देता मुलांचा बौद्धिक, सामाजिक, मानसिक आणि शारीरिक विकास होणे गरजेचे असून, मैदानी खेळ आणि विविध स्पर्धांच्या माध्यमातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर शिस्त व संस्कार घडवावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच, मातृभाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची आकलन क्षमता अधिक वाढते, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. या सोहळ्यादरम्यान उपमुख्यमंत्र्यांनी स्वतःच्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. मी देखील याच किसननगर येथील शाळा क्रमांक २३ चा माजी विद्यार्थी असून मला या शाळेचा सार्थ अभिमान आहे, अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. पूर्वी ही शाळा एका चाळीसारखी होती, ज्याला दरवाजेही नव्हते. आम्ही स्वतः वर्गाची साफसफाई करून तिथे अभ्यासाला बसायचो, पण त्या वेळचा आनंद काही वेगळाच होता, अशी आठवण त्यांनी सांगितली. आपल्या जुन्या गुरुजनांचे आभार मानताना त्यांनी रघुनाथ परमगुरुजी, निकम सर, पाठक सर, राणे गुरुजी आणि राऊत बाई अशा सर्व शिक्षकांची नावे आदराने घेतली. महापालिकेच्या शाळेत शिकलेली मुले आज राज्याच्या सर्वोच्च पदांवर काम करत आहेत, याचे उत्तम उदाहरण स्वतः मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचलेला हा तुमचा 'बापूसो' म्हणजेच मी स्वतः तुमच्या समोर उभा आहे, असे सांगताच विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना दाद दिली. शिक्षकांच्या खांद्यावर देशाचे भवितव्य घडवण्याची मोठी जबाबदारी असल्याचे अधोरेखित करण्यासाठी उपमुख्यमंत्र्यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या सुप्रसिद्ध विधानाचा दाखला दिला. वकिलाची, इंजिनिअरची किंवा डॉक्टरची चूक एका मर्यादेपर्यंत लपून राहू शकते, परंतु शिक्षकाने केलेली एक चूक संपूर्ण समाजात आणि देशात पिढ्यानपिढ्या प्रतिबिंबित होते, त्यामुळे शिक्षकांची जबाबदारी अत्यंत संवेदनशील आहे. राज्य सरकारने विद्यार्थ्यांवरील दप्तराचे ओझे कमी केले असून शालेय पोषण आहारातही मोठ्या सुधारणा केल्या आहेत, असे सांगत त्यांनी शिक्षकांना पहिल्या बेंचपासून शेवटच्या बेंचवरील प्रत्येक मुलाकडे वैयक्तिक लक्ष देण्याची सूचना केली. नाशिकमधील एका जिल्हा परिषद शाळेचा दाखला देत, तिथली मुले दोन्ही हातांनी इंग्रजी व मराठी लिहीत होती आणि त्यांना ३०० पर्यंत पाढे तोंडपाठ होते, असा अनुभव सांगून शिक्षकांनी बदलत्या काळानुसार स्वतः 'टेक्नोसॅव्ही' होऊन विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवरील ज्ञान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

शाळेचे वातावरण प्रसन्न आणि आरोग्यदायी असण्यावर भर देत उपमुख्यमंत्र्यांनी महापालिका आयुक्तांना कडक निर्देश दिले. शहरातील महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये 'व्हिजिलन्स स्कॉड' (सतर्कता पथक) पाठवून तिथली स्वच्छता, पिण्याचे शुद्ध पाणी आणि स्वच्छतागृहांची पाहणी करण्यात यावी आणि कुठेही त्रुटी आढळल्यास त्या तात्काळ दूर कराव्यात, अशी सूचना त्यांनी केली. विद्यार्थ्यांच्या सुखसोयींसाठी आणि शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. भाषणाचा शेवट करताना त्यांनी, "उडान भरनी है, तो परों को मजबूत करो, सपने देखने से पहले आँखों को जागृत करो, राह में कांटे है तो क्या डरना, फूलों की मांग के लिए मेहनत तो करो..." या प्रेरक ओळी सादर करत विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आणि शिक्षकांना भावी पिढी घडवण्यासाठी मनापासून शुभेच्छा दिल्या.

## दिव्यांग विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्पाने स्वागत



■ मुंबई (दै. संध्या)

शाळा प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव डॉ. माणिक गुरसाळ यांनी ताडदेव येथील व्हिक्टोरिया मेमोरियल स्कूल फॉर द ब्लाइंड या अंध विद्यालयाला भेट देऊन दिव्यांग विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.

डॉ. गुरसाळ यांनी विद्यालयातील विविध वर्गांना भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शाळेचा पहिला दिवस असल्याने विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. संवादादरम्यान विद्यार्थ्यांनी डॉ. गुरसाळ यांना आयएएस परीक्षा कशी असते, त्यासाठी कोणती तयारी करावी लागते यासंदर्भात प्रश्न विचारले. डॉ. गुरसाळ यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना अत्यंत सहजतेने उत्तरे देत मार्गदर्शन केले व शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे उपसचिव विष्णुदास घोडके, अवर सचिव साईप्रसाद मुकदाडवार, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण तथा सहाय्यक आयुक्त दिव्यांग सक्षमीकरण विभाग समाधान इंगळे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी रूपाली पाटील, व्हिक्टोरिया मेमोरियल अंध महाविद्यालयाच्या प्राचार्या रजनी हिरमेठ; तसेच संस्थेच्या अध्यक्षा मीना देशपांडे आदी यावेळी उपस्थित होते. दृष्टिहीन विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शतकाहून अधिक काळ कार्यरत असलेल्या व्हिक्टोरिया मेमोरियल स्कूल फॉर द ब्लाइंड या संस्थेने समाजात शिक्षण आणि स्वावलंबनाचा आदर्श निर्माण केला आहे. सन 1902 मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेत दृष्टिहीन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासह निवास, भोजन, संगणक प्रशिक्षण, संगीत, क्रीडा आणि विविध व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाते. मुंबईतील ताडदेव परिसरात असलेल्या या संस्थेने हजारो दृष्टिहीन विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, ग्रंथालय सुविधा; तसेच अन्य विविध कौशल्यविकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत.

## नवीन मालिकेतील आकर्षक नोंदणी

■ पुणे (दै. संध्या)

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे दुचाकी वाहनांसाठी नवीन नोंदणी मालिका सुरू करण्यात येत असून, खासगी चारचाकी वाहनांकरिता आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक तीनपट व नियमित शुल्क भरून राखून ठेवण्याकरीता आगाऊ अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत. आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक इच्छुक वाहनधारकांनी १६ जून रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या कार्यालयीन वेळेत विहित नमुन्यातील अर्ज, डीडी, पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र व पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतींसह प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथील खाजगी वाहन विभागात सादर करावेत. एखाद्या एका क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास त्यांची यादी कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर अर्जांसाठी लिलावाचे डीडी १७ जून रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील व त्याच दिवशी दुपारी ४ वाजता सभागृहात लिलाव होईल. त्याचप्रमाणे, दुसऱ्या टप्प्यात आकर्षक व पसंतीच्या क्रमांकांसाठी अर्ज दिनांक १७ जून रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत स्वीकारण्यात येणार आहेत. या अर्जांसाठीचे लिलावाचे डीडी १८ जून रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वीकारले जातील व दुपारी ४ वाजता सहकार सभागृहामध्ये लिलाव आयोजित करण्यात येईल. लिलावासाठी सादर करण्यात येणारे डीडी हे "R.T.O., Pune" या नावाने नॅशनलाइज्ड/शेड्युल्ड बँकेचे, पुणे येथील असणे आवश्यक असून ते दोन महिन्यांपेक्षा जुने नसावेत.

## 'गुणसागर निर्गुणी' मधून उलगडणार गुरुवर्य पं. नीळकंठ अभ्यंकर यांच्या अमूल्य संगीत रचनांचा सुरेल ठेवा

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ज्येष्ठ संगीतकार गुरुवर्य पं. नीळकंठ अभ्यंकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'गुणसागर निर्गुणी – अमूल्य संगीत रचनांचा जागर' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ३२ गुणवंत गायक, गायिका आणि लोकप्रिय कलावंतांच्या संचातील हा अभिनव सांगीतिक आविष्कार बुधवार, १७ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता प्रभादेवी, मुंबई येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे रसिकांच्या भेटीला येणार आहे.

गुरुवर्य पं. नीळकंठ अभ्यंकर यांनी आपल्या प्रतिभासंपन्न संगीत रचना, चिंतनशील सांगीतिक दृष्टिकोन आणि अभिजात संगीताच्या माध्यमातून भारतीय संगीतविश्वात स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या रचनांमधील भावस्पर्शी सूर, आध्यात्मिक विचार आणि कलात्मक समृद्धी आजही रसिकांना मंत्रमुग्ध करतात. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून त्यांच्या अमूल्य संगीत वारशाला कृतज्ञ अभिवादन करण्यात येणार आहे.

'गुणसागर निर्गुणी' या कार्यक्रमाची संकल्पना आणि दिग्दर्शन डॉ. वर्षा भावे यांनी केले असून, संगीत संयोजनाची जबाबदारी कमलेश भडकमकर यांनी सांभाळली आहे. या कार्यक्रमात ३२ गुणवंत गायक, गायिका आणि लोकप्रिय कलावंत पं. अभ्यंकर यांच्या निवडक आणि अजरामर संगीत रचनांना आपल्या सुरेल आवाजातून नव्याने सादर करणार आहेत.या कार्यक्रमात वाद्यसाथीसाठी अर्चिस लेले, निषाद करगीलकर, हनुमंत रावडे, अमोघ दांडेकर, भरत भडकमकर, दर्शना जोग, दीप वझे, प्रणव हरिदास आणि कमलेश भडकमकर हे नामवंत वादक सहभागी होणार असून त्यांच्या सुरेल साथसंगतीमुळे कार्यक्रमाची रंगत अधिक खुलणार आहे. महाराष्ट्राच्या समृद्ध सांगीतिक परंपरेचे जतन व संवर्धन करून हा सांस्कृतिक वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम साकार होत आहे.

या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य असून संगीतप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून गुरुवर्य पं. नीळकंठ अभ्यंकर यांच्या अमूल्य संगीत रचनांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडेयांनी केले आहे.

## भाजपचे नागपूरचे नगरसेवक मुंबईकडे रवाना

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यात विधान परिषदेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. या निवडणुकीत महायुतीचे जवळपास 6 उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. इतर उमेदवार निवडून आणण्यासाठी महायुतीने कंबर कसली आहे. महायुतीकडे पुरेसं संख्याबळ आहे. गणिताच्या आकड्यात महायुती मजबूत आहे. मात्र कोणताही दगाफटका होऊ नये म्हणून महायुतीकडून खबरदारी घेतली जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सुद्धा ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. फडणवीस यांनी नागपुरातील नगरसेवकांना जेवणासाठी आमंत्रण दिलं आहे. या नगरसेवकांशी डिनर पे चर्चा करण्यात येणार आहे. त्यामुळे या डिनर पे चर्चाकडे अवघ्या महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे.

भाजपचे नागपूर शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी या डिनर पे चर्चेची माहिती दिली आहे. नागपूरातील भाजपच्या नगरसेवकांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून जेवनाचं निमंत्रण देण्यात आलं आहे. येत्या 18 तारखेला नागपुरात विधानपरिषद निवडणूकीसाठी मतदान होणार आहे. त्यापूर्वी मुख्यमंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकडे डिनर पे



चर्चा होणार आहे. 17 तारखेला वर्षावर मुख्यमंत्र्यांनी भाजपच्या सर्व नगरसेवकांना जेवणासासाठी निमंत्रण दिलं आहे. 16 तारखेला तारखेला रामभाऊ माळगी प्रबोधिनी येथे मुख्यमंत्री नगरसेवकांचं एक सत्र घेणार आहेत, अशी माहिती दयाशंकर तिवारी यांनी दिली आहे. दरम्यान, मुख्यमंत्र्यांचं जेवणाचं आवतन आल्यानंतर नागपूरातील काही नगरसेवक मुंबईला निघाले आहेत. मुंबईत पक्षाच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नगरसेवक मुंबईला निघाले आहेत. विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर बहुतांश नगरसेवक आधीच सहलीला गोव्याला गेले आहेत. पण जे भाजप नगरसेवक गोव्याला जाऊ शकले नाही, ते आज मुंबईसाठी निघाले आहेत. आता भाजपचे सर्व नगरसेवक विधानपरिषद निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी परत येणार आहेत. राज्यातील विधान परिषदेची निवडणूक येत्या 18 तारखेला होत आहे. 18 जून रोजी मतदान होणार असून 22 जून रोजी मतमोजणी होणार आहे. एकूण 17 जागांसाठी ही निवडणूक होत आहे.

### असा आहे कार्यक्रम

अर्ज भरण्याची शेवटची तारीख- 1 जून
उमेदवारांच्या अर्जांची छाननी- 2 जून
अर्ज माघारीची मुदत- 4 जून
मतदान- 18 जून (स.8 ते दु.4)
मतमोजणी- 22 जून
कोण आलं बिनविरोध?
ठाणे – रवींद्र फाटक – शिवसेना (शिंदे)
रायगड – रत्नागिरी – सिंधुदुर्ग – अनिकेत तटकरे – अजितदादा गट
पुणे – विक्रम काकडे – अजितदादा गट
वर्धा – गडचिरोली – चंद्रपूर – अरुण लखाणी – भाजप
यवतमाळ – दुष्यंत चतुर्वेदी – शिवसेना (शिंदे)
अहिल्यानगर – प्राजक्त तनपुरे – भाजप

## विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाची तारीख ठरली

■ मुंबई (दै. संध्या)

मोठी बातमी समोर येत आहे, कामकाज सल्लागार समितीची बैठक संपली असून, आता पावसाळी अधिवेशनाची तारीख जाहीर झाली आहे. येत्या 22 जूनपासून पावसाळी अधिवेशनाला सुरुवात होणार आहे. 10 जुलैपर्यंत हे अधिवेशन असणार आहे. तीन आठवडे चालणाऱ्या या अधिवेशनामध्ये काही मुद्दे हे चांगलेच गाजण्याची शक्यता असून, विरोधकांकडून सरकारच्या कोंडीचा प्रयत्न होऊ शकतो. सरकारने नुकतीच शेतकऱ्यांना दोन लाखांची कर्जमाफी केली आहे. परंतु त्यामध्ये काही अटी अशा आहेत, ज्यांचा शेतकऱ्यांना फटका बसू शकतो. ज्या शेतकऱ्यांचं कर्ज हे दोन लाखांपेक्षा अधिक आहे, त्या शेतकऱ्यांना उर्वरीत रक्कम आधी भरावी लागणार आहे, त्यानंतरच त्यांना दोन लाख रुपयांचा कर्जमाफीचा फायदा होणार आहे.

दरम्यान सरकारने ही अट रद्द करावी अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे, त्यानंतर त्यांनी तीन दिवस अन्नत्याग आंदोलन देखील केलं, अखेर तिसऱ्या दिवशी त्यांनी आपलं आंदोलन मागे घेतलं. त्यामुळे या अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीचा मुद्दा गाजण्याची शक्यता आहे. यावरून विरोधक सरकारच्या कोंडीचा प्रयत्न



करू शकतात. त्याचसोबत इरही काही मुद्दे आहेत, ज्यावरून या अधिवेशनात विरोधक आक्रमक होऊ शकतात. दरम्यान अधिवेशनाची तारीख जाहीर झाल्यानंतर काँग्रेसचे नेते नाना पटोले यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. अधिवेशन हे फक्त 14 दिवसांचं होणार आहे, परंतु हे अधिवेशन कमीत कमी 1 महिन्यांचं व्हावं अशी आमची मागणी असल्याचं नाना पटोले यांनी म्हटलं आहे. महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात आक्रोश आहे, परंतु पुरवणी मागण्या मंजूर करणे एवढाच सरकारचा या अधिवेशनातून उद्देश असतो, असा टोलाही यावेळी नाना पटलो यांनी लगावला आहे. दरम्यान रविवारी उद्धव ठाकरे यांनी आपल्या खासदारांची बैठक बोलावली होती, त्यामुळे पुन्हा एकदा ऑपरेशन टायगर चर्चेत आलं आहे, यावरून देखील नाना पटोल यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. देश तोडायच काम सुरु आहे, भाजपा तोडफोडचं राजकारण करत आहे. जेपी नड्डा आधीच बोलले होते की राज्य पातळीवरचे सर्व पक्ष आपल्याला पाहिजे आहेत. राज्यपातळीवरचे पक्ष आम्ही तोडू असे ते म्हणाले आहेत, असं यावेळी पटोले यांनी म्हटलं आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सोनाली शिंदे अपहरण प्रकरणी तात्काळ कारवाईची मागणी

■ विजय जाधव यांचे हडपसर पोलिसांना निवेदन

पुणे (दैनिक संध्या) : हडपसर येथील नाथपंथी डवरी गोसावी समाजातील युवती व घरकामगार सोनाली बाळाराम शिंदे हिच्या संशयित अपहरण प्रकरणी तात्काळ गुन्हा दाखल करून तिचा शोध घेण्याची मागणी पुणे जिल्हा राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) चे जिल्हाध्यक्ष तथा भैरव क्रांती सेनेचे प्रदेशाध्यक्ष विजय सुदामराव जाधव यांनी केली आहे. याबाबत हडपसर पोलीस स्टेशन येथे सोनाली शिंदे हिच्या कुटुंबियांसमवेत पोलीस निरीक्षक श्री. जगदाळे यांना निवेदन देण्यात आले. उपलब्ध सीसीटीव्ही फुटेजमध्ये अज्ञात व्यक्तीने सोनालीला जबरदस्तीने वाहनात बसवून नेल्याचे दिसून येत असल्याने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ तपास करण्याची मागणी करण्यात आली. सोनाली शिंदे ही असंघटित क्षेत्रातील घरकामगार महिला असून तिच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर असल्याचे विजय जाधव यांनी नमूद केले. तसेच सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन व इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध घेऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) व भैरव क्रांती सेना पीडित कुटुंबाच्या पाठीशी ठामपणे उभी असून सोनाली शिंदे हिला न्याय मिळेपर्यंत पाठपुरावा सुरू राहील, असे विजय जाधव यांनी सांगितले.



### पुरोगामी विद्यालयात नवागतांचे स्वागत

हवेली (दैनिक संध्या) : शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ चा आज पहिला दिवस नवीन शाळेत जाण्याची उत्सुकता, आणि पालकांसमवेत थोडे घाबरलेले चेहरे पण मनी नवीन शाळेत प्रवेश या स्थितीत विद्यार्थी विद्यालयाच्या प्रांगणात येतात.पण विद्यालयातील जुन्या विद्यार्थ्यांनी आणि संस्था पदाधिकारी व शिक्षक या नवख्या विद्यार्थ्यांवर पुष्प वृष्टी करून त्यांचे स्वागत करतात आणि या अनुभवाने नवागत विद्यार्थी आनंदी आणि आश्वासक होतात.पुरोगामी माध्यमिक विद्यालय नायगाव या विद्यालयात आज नवागतांचा प्रवेशोत्सव अतिशय उत्साही वातावरणात पार पडला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष पुरोगामी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळासाहेब चोरघे हे होते तसेच संस्थेचे सचिव रंगनाथ आप्पा कड उपाध्यक्ष रामदास चौधरी, विश्वस्त दत्तात्रय चौधरी, भिकाजी चौधरी, सुनील चोरघे संगीताताई चौधरी,अनील लोणकर, शिवाजी चौधरी, तुळशीराम चौधरी,राघवदास चौधरी, मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड पर्यवेक्षक राजीव चव्हाण सर्व शिक्षक विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. विद्यालयाच्या प्रवेशद्वारावर मुलांचे स्वागत करून बॅन्ड पथकाच्या तालावर व पुष्पवृष्टी करत विद्यार्थ्यांना मैदानावर आणले.त्यानंतर इ.पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब चोरघे, सचिव रंगनाथ आप्पा कड, उपाध्यक्ष रामदास चौधरी, यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल ठोंबरे यांनी केले.तर आभार मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड यांनी केले.

### खालुंब्रे ग्रामपंचायतीची आरक्षण सोडत जाहीर

चाकण (दैनिक संध्या) : राज्यातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या व सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या नवनिर्मिती ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमाबाबत ग्रामस्थांची संवाद साधण्याकरता आयोजित करण्यात आलेल्या खालुंब्रे ग्रामपंचायतीच्या विशेष ग्रामसभेत आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. खेड पंचायत समितीच्या विस्ताराधिकारी स्वाती भाईरकर व ग्राम महसूल अधिकारी व्ही.एस. झेंडे यांच्या अध्यक्षतेखाली खालुंब्रे ग्रामपंचायतीच्या सभागृहात या ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. खालुंब्रे ग्रामपंचायतीसाठी तीन प्रभाग आहेत. प्रभाग क्रमांक एक मध्ये सर्वसाधारणसाठी एक जागा, अनुसूचित जाती महिला वर्गासाठी एक व नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी एक जागा आहे. प्रभाग क्रमांक दोन मध्ये सर्वसाधारण साठी एक व सर्वसाधारण महिलेसाठी दोन जागा आहेत. तसेच प्रभाग क्रमांक तीन मध्ये सर्वसाधारण साठी एक जागा, अनुसूचित जमाती महिलेसाठी एक, तर नागरिकांच्या मागास प्रवर्ग महिलांसाठी एक जागा आहे.

# गुरुकुल विद्यालयात 'विद्यार्थी प्रवेशोत्सव' उत्साहात साजरा

**ढोल-ताशांचा गजर अन् पुष्पवृष्टी**

सासवड (दै. संध्या)

सासवड येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, गुरुकुल पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात १५ जून रोजी 'विद्यार्थी प्रवेशोत्सव' मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी ढोल-ताशांच्या गजर, फुलांची उधळण आणि औक्षण करून नवागतांचे स्वागत करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेच्या अध्यक्षा व नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, विश्वस्त शरदचंद्र जगताप, सहसचिव दत्तात्रय गवळी, व्यवस्थापक कानिफनाथ आमराळे आणि उपस्थित पालक प्रतिनिधींच्या हस्ते सरस्वती माता तसेच संस्थेचे संस्थापक स्व. चंदूकाका जगताप यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले.



शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचा धीर वाढावा आणि त्यांच्या मनात शाळेबद्दल गोडी निर्माण व्हावी, यासाठी शिक्षकांनी व व्यवस्थापनाने जय्यत तयारी केली होती. शाळेत प्रवेश करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली, त्यांचे औक्षण करून आणि हातात गुलाबपुष्प देऊन विद्यालयात स्वागत करण्यात आले. ढोल-ताशांच्या सुरांनी संपूर्ण शाळा परिसर दुमदुमून गेला होता.

नित्य परिपाठानंतर विद्यालयाचे मुख्याध्यापक विजयकुमार हाके व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका प्रिया गायकवाड यांनी उपस्थित मान्यवर, पालक व विद्यार्थ्यांचे शाब्दिक स्वागत केले. मुख्याध्यापक हाके सर यांनी प्रास्ताविकातून शाळेच्या ध्येय-धोरणांवर प्रकाश टाकला. तर संस्थेचे सहसचिव दत्तात्रय गवळी यांनी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत मोलाचे मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन रूपाली फडतरे यांनी केले. प्रशालेतील सहशिक्षक उमेश भोई, श्रीकांत सस्ते आणि सरीता क्षीरसागर यांच्या नियोजनाखाली, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हा प्रवेशोत्सव अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साहाच्या वातावरणात पार पडला.

# जेजुरीत दारू पिऊन भाविकांचा धिंगाना

## भाविकांच्या मारहाणीत आठ स्थानिक जखमी तर चार भाविक जखमी

जेजुरी (दै. संध्या)

■ ग्रामस्थांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण

सोमवती यात्रेनिमित्त कल्याण तालुक्यातून भाविक जेजुरीत देवदर्शनाला आले होते. येथील जेजुरी गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या गोडसे हॉल येथे उतरले होते. यातील काही भाविकांची जोरदार दारू पार्टी झाली. पार्टीतच भविकांत भांडणे जुंपली. भाविकातील भांडणे सोडवण्यासाठी हॉलचे मालक गोडसे व इतर सातजण गेले असता त्यांना ही भाविकांनी जबर मारहाण केल्याची घटना घडली आहे.



या मारामारीत जखमी झालेले हनुमंत शंकर गोडसे, प्रवीण हनुमंत गोडसे, राहुल पांडुरंग गोडसे, धनंजय प्रककाश गोडसे, हरिभाऊ शंकर गोडसे, शीतल धनंजय गोडसे, संजय ज्ञानेश्वर तांबे सर्वजण रा. चिंचेची बाग जेजुरी यांसह निलेश कांताराम भिसे, सुरज द्वारकानाथ भोईर, दोघे रा. रायता, ता. कल्याण जि. ठाणे, भूषण किसन रोने, किसन वामन रोने, दोघे पिंपळोली, ता.कल्याण जि. ठाणे, असे जखमी झालेले आहेत.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, ठाणे जिल्ह्यातून ३०ते ३५ भाविक जेजुरीस सोमवती यात्रेसाठी जेजुरीत आले होते. आज दुपारी ३ च्या दरम्यान यातील काही भाविकांनी नशापान केले. यातून त्यांच्यात भांडने सुरु झाली होती. भांडण वाढू लागल्याने हॉल चे मालक राहुल गोडसे आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनी भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला. भाविकांनी त्यांनाच दगड आणि दांडक्यांनी मारहाण केली. मारहाण करून काही भाविक पळून जात असताना स्थानिकांनी जेजुरी पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. पळून जाणाऱ्यांना स्थानिकांनी अडवण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी दगडफेक केली. यामुळे स्थानिकही जखमी झाले आहेत. या गडबडीत घटना स्थळी पोलीस पोहचेपर्यंत काही भाविक पळून गेले आहेत.

**स्थानिक जेजुरीकरांत प्रचंड संताप**

देव दर्शनासाठी येथे येणारे भाविक दारू पिऊन डीजे व वाद्याच्या तालावर धिंगाणा घालतात. यामुळे सामाजिक सलोखा बिघडत आहे. ग्रामस्थांनी या दोन्ही वर रात्री दहा नंतर जेजुरी पोलिसांकडून बंदी आणावी अशी मागणी होत आहे. सदर संबंधित व्यक्तींवर कडक कारवाई करावी अन्यथा गाव बंद ठेवून उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

मारहानीच्या प्रकारानंतर पोलिसांनी जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आहे. या प्रकरणी काही भाविकांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे, रात्री उशीरापर्यंत जेजुरी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु होते.

गेल्या महिनाभरात जेजुरीत येणाऱ्या भाविकांकडून स्थानिकांना मारहाण करण्याचे दोन तीन प्रकार झाले आहेत. घटनास्थळी दारूच्या बाटल्यांचे बॉक्स, रिकाम्या दारूच्या बाटल्यांचा खच पडलेला होता.

## राणुबाईमळा येथे शौचालयाच्या बांधकामाचे दिमाखात उद्घाटन

चाकण (दै. संध्या)

स्व.आ. सुरेशभाऊ गोरे यांची प्रेरणा घेऊन चाकण नगरपरिषद हद्दीतील राणुबाईमळा येथे अंगणवाडी क्र. ८० मधील चिमुकली मुले व मातांच्या सुविधेसाठी अत्यंत गरजेच्या असलेल्या नवीन शौचालयाच्या बांधकामाचे उद्घाटन नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्या हस्ते दिमाखात करण्यात आले. याप्रसंगी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे, नगरसेविका आरती परदेशी, स्वाती लेंडघर, हर्षद लेंडघर, मंगेश कांडगे, विकास धाडगे, जयश्री नायकवाडी, हेमंत बिरदवडे, सागर धाडगे, धीरज केळकर, संतोष लेंडघर, अभिजीत बिरदवडे, राहुल कांडगे, महेश शेवकरी आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मनीषा गोरे यावेळी म्हणाल्या," चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातून आरोग्य, स्वच्छता व अंगणवाडीचा विकास करण्यास



आम्ही कटिबद्ध राहू. स्व.आ. सुरेश भाऊ गोरे यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून गावचा विकास हाच आमचा ध्यास राहील. राणूबाईमळा येथील शौचालयाचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्यात येईल. येथील शालेय विद्यार्थ्यांसाठी लागणारे सर्व सहकार्य नगरपरिषदेच्या माध्यमातून केले जाईल."

## विश्वशांतीनिकेतन विद्यालयाला आदर्श शाळा पुरस्कार

चाकण (दै. संध्या)

गुणवत्तेची परंपरा अखंडितपणे राखणाऱ्या येथील विश्वशांती निकेतन विद्यालयाचा आदर्श शाळा पुरस्काराने गौरव करण्यात आला. येथील विश्वशांतीनिकेतन विद्यालय, गुरुकुल विश्वशांतीनिकेतन विद्यालय अँड एक्स्ट्रा ऍक्टिव्हिटी सेंटर व विश्वशांतीनिकेतन विद्यालय गुरुकुल केजी ते पीजी या शाखेच्या प्रि स्कूलचा या गौरव पुरस्कारामध्ये समावेश आहे. राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यसभा खासदार प्राचार्या मेघा कुलकर्णी, शिक्षण संचालक शरद गोसावी, प्रा. सुनील मोरे आदी मान्यवरांच्या हस्ते डॉ.प्रा. प्रवीण आघाव यांनी हा पुरस्कार स्वीकारला. सन्मानपत्र, गौरवचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. चाकण पंचक्रोशीमध्ये विश्वशांती निकेतन विद्यालयाची शैक्षणिक वाटचाल उल्लेखनीय आहे. आरोग्य, संस्कार व शिक्षण या त्रिसूत्रीच्या आधारे विद्यालय ज्ञानदानाचे कार्य यशस्वीपणे करत आहे.

विशेष म्हणजे शालेय विद्यार्थ्यांना केंद्रीय बोर्डाचे सीबीएसई पॅटर्नचे अध्यापन केले जाते. भारतीय संस्कृतीचे शिक्षण व विविध प्रकारचे सण, माहिती देऊन साजरे केले जातात. पालकांसाठी विविध विषयांवर चर्चासत्र, व्याख्यानाचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालय सतत कटिबद्ध असल्याचे प्राचार्या अर्चना आघाव व डॉ. प्रवीण आघाव यांनी सांगितले.

## जिजामाता शैक्षणिक संकुलात नव्या शैक्षणिक वर्षाचे उत्साहात स्वागत

*पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत शालेय पाठ्यपुस्तकांचे वाटप*

जेजुरी (दै. संध्या)

जिजामाता शैक्षणिक संकुल येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. शाळेच्या प्रवेशद्वारावर पुष्पवृष्टी, टाळ्यांचा कडकडाट आणि आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत शाळेच्या विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांची माहिती देण्यात आली.

शाळेचा परिसर आकर्षक फलक, रांगोळी आणि सजावटीने सुशोभित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि उत्सुकता पाहून पालकांनीही समाधान व्यक्त केले.



पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांची लक्षणीय उपस्थिती असल्याने संपूर्ण परिसरात नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नियमितता, शिस्त आणि परिश्रम यांच्या माध्यमातून ध्येयपूर्तीसाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. जिजामाता शैक्षणिक संकुल विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास जिजामाता प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गायत्री बेलसरे, पर्यवेक्षिका लीना पायगुडे, पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप, पाठ्यपुस्तक विभाग प्रमुख सोनबा दुर्गाडे, सोमनाथ उबाळे, ज्युनिअर विभाग प्रमुख किरण मोडक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत शालेय पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंदमय, प्रेरणादायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाली.

# माहूर माध्यमिक विद्यालयात नवागतांचे उत्साहात स्वागत

सासवड (दै. संध्या)

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड या संस्थेच्या डोंगरी भागातील माहूर येथील माहूर माध्यमिक विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी नवागतांचे अत्यंत उत्साहात आणि दिमाखात स्वागत करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी ढोल-ताशांचा गजर, गुलाबपुष्प आणि अंगावर होणारी फुलांची उधळण पाहून बालचमूंचे चेहरे आनंदाने न्हाऊन निघाले होते. नव्या शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी आयोजित या विशेष स्वागत समारंभाप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, माजी जिल्हा परिषद सदस्य हेमंतकुमार माहूरकर, सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक तुषार माहूरकर, माजी सरपंच तुषार जगताप आणि दादा जगताप यांसह मोठ्या संख्येने पालक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्येची देवता माता सरस्वती आणि श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक, शिक्षणमहर्षी स्व. चंदुकाका जगताप यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. विद्यालयाचे मुख्याध्यापक हनुमंत पवार यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे आणि पालकांचे शाब्दिक स्वागत केले. शाळेच्या पहिल्याच दिवशी प्रशासनाच्या वतीने सर्व नवोदित विद्यार्थ्यांना पुस्तके आणि खाऊचे वाटप करण्यात आले, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा शाळेचा पहिला दिवस अधिकच गोड झाला. याप्रसंगी बोलताना जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचा संदेश दिला. ते म्हणाले, "ग्रामीण आणि डोंगरी भागातील विद्यार्थ्यांनी कोणत्याही परिस्थितीत खचून न जाता जिद्दीने आणि कष्टाने अभ्यास केला पाहिजे. शिक्षणाचा दर्जा उत्तम असून विद्यार्थ्यांनी याचा पुरेपूर फायदा उठवून आयुष्यात मोठे यश संपादन करावे." सूत्रसंचालन सहशिक्षक रामप्रभू पेटकर यांनी रामचंद्र जगताप यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक इंद्रभान पठारे, विकास राऊत, लता गायकवाड, स्नेहलता टिळेकर तसेच रामभाऊ कुंभार, श्रीकांत खोमणे, मंगल जगताप आणि श्रीकांत गव्हाणे आदींनी विशेष परिश्रम घेत उत्तम नियोजन केले. शाळेच्या या आगळ्यावेगळ्या स्वागतामुळे माहूर परिसरात कौतुकाचा वर्षाव होत आहे.




माहूर (ता. पुरंदर) येथील माध्यमिक विद्यालयात नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी नवागतांचे पुस्तके देऊन स्वागत करताना जिल्हा परिषद सदस्य हरीभाऊ लोळे, हेमंतकुमार माहूरकर, तुषार माहूरकर, मुख्याध्यापक हनुमंत पवार व इतर मान्यवर.

